


धुनीतील अग्नीला शांत करण्याचा चमत्कार

६० पैसे

१९७४

जुलै

# अनुक्रमणिका-जुलै १९७४


| | |
|---|---|
| १. संपादकीय–गुरुपूजनाचे महत्व, कृतज्ञता<br>प्रा. डॉ. माधवराव दाभाडे यांचे निधन | |
| २. भगवान वेदव्यासांची स्मृती | आचार्य काकासाहेब कालेलकर |
| ३. भगवान श्रीनित्यानंद महाराज | सुभाष चेंदवणकर |
| ४. "कोणी काही म्हणा"– | श्री. बी. आर. काकडे |
| ५. गाठीभेटी–श्री. हरीश तालीम | श्री. सदानंद चेंदवणकर |
| ६. मौल्यवान ॐ (ओम) खडा | |
| ७. नामसंकीर्तन | श्री. बाळकृष्ण धामणकर |
| ८. श्रीसाईनाथ महाराज ललितचरित्र:– | श्री. र. श्री. पुजारी |
| ९. श्रीगोंदवलेकर महाराज व्यक्तिदर्शन | श्री. पु. मु. अत्रे |
| १०. नित्य मी जिवंत– | श्री. चंद्रकांत सामंत |
| ११. श्रीसाईगीतमाला | श्री. मधुकर जोशी |
| १२. सदा सर्वदा साईनाम घ्यावे | श्री. विजय रेगे |
| १३. गाठ रेशमाची | श्री. भ. धों. कुंभकर्ण |
| १४. श्रीसाईनाथ वंदन, साईजी आले | श्री. श्रीराम आठवले |
| १५. एक प्रेरणा | लक्ष्मीतनया |
| १६. स्वप्न | श्री. विनायक पाठक |
| १७. पोटाची वेलांटी–<br>आळसाचे पाय | डॉ. श्रीराम पंडीत |
| १८. "साहित्य–दर्शन" | श्रीसाईनंद |
| १९. शिरडीवृत्त–समाचार | |

जगा लावावें सत्पथीं । हेंचि साईलीलेची कृती ॥



# श्री साई वाक्सुधा

साधूंचें व्हावें संरक्षण । असाधूंचें समूळ निर्दळण ।
एतदर्थचि ईश्वरावतरण । संत हे विलक्षण यापरते ॥४॥

साधु असाधु संतां समान । एक मोठा एक ऊन ।
हें जाणेना जयांचें मन । समसमान उभयां जे ॥५॥

ईश्वराहूनि संत मोठे । असाधूंसी आधीं लाविती वाटे ।
मन जयांचें तिळतिळ तुटे । प्रेम दाटे दीनार्थ ॥६॥

भवसागराचे हे अगस्ति । अज्ञानतमाचे हे गभस्ति ।
परमात्म्याची एथेंच वस्ती । वस्तुतः हे तदभिन्न ॥७॥

ऐशांतील हा साई माझा । अवतरला भक्तकाजा ।
मूर्तिमंत ज्ञानराजा । कैवल्यतेजाधिष्ठित ॥८॥

श्रीसाईसच्चरित–अध्याय १२ वा

---


# श्रीसाईलीला

[ श्रीसाईबाबा संस्थान, शिरडीचे अधिकृत मासिक ]

वर्ष ५२ वे ] जुलै १९७४ [ अंक ४

: संपादक :

श्री. का. सी. पाठक

: कार्यकारी संपादक :

- डॉ. श्री. दि. परचुरे, एम. ए. पी, एचडी., रा. भा. प्रवीण
- श्री. सदानंद चेंदवणकर, बी. एस्‌सी, एस. टी. सी., रा. भा. प्रवीण

वार्षिक वर्गणी रु. ६–०० (ट. ख. सह)

किरकोळ अंक रु. ०-६० फक्त.

*

: कार्यालय :

साईनिकेतन, प्लॉट नं. ८०४ बी, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४.

पीन : ४०००१४ दूरध्वनी : ४४३३६१

संपादकीय

# परमार्थमार्गात गुरुपूजनाचे महत्व अधिक का?

आषाढ शुद्ध पौर्णिमेस गुरुपौर्णिमा असे म्हणतात आणि प्रत्येक भारतीय आपल्या मानलेल्या गुरूचे पूजन मोठ्या भावनेने या दिवशी करताना आढळून येतो. कोणतीही कला अथवा विद्याही सर्वसाधारणपणे कोणाही व्यक्तीला उपजतच येऊ शकत नाही. आणि त्या विद्येतील अथवा कलेतील निष्णात आणि अनुभवी मार्गदर्शकाची मदत ही घ्यावीच लागते. त्याशिवाय प्रगती होऊ शकत नाही. अर्थात अशा मार्गदर्शक व्यक्तीचे ऋण कोणत्याही संपत्तीने फेडता येत नाही. त्यासाठी अखंड जाणीव व पूज्य भावना त्या व्यक्तीबद्दल ठेवणे हा एकमेव मार्ग आपल्या हाती रहातो व हाच मार्ग सर्वमान्य म्हणून बहुतेकजण अनुसरतात. आपल्या शास्त्रामध्ये असे स्पष्ट वचन आहे की अध्यात्मविद्या ही सर्व विद्यांमध्ये श्रेष्ठ आहे ("अध्यात्मविद्या विद्यानां") आणि म्हणूनच आपल्या द्रष्टया पूर्वजांनी या विद्येला अत्यंत महत्व दिले व अध्यात्मविद्येची सिद्धी हेच मानवी जीवनाचे अंतिम साध्य ठरवून दिले.

अध्यात्मविद्येचे एवढे श्रेष्ठ कशासाठी मानले हा प्रश्न उद्‌भवण्याचे वास्तविक कारण नाही परंतु अलीकडच्या काळात अध्यात्मविद्येपेक्षा इतर शास्त्रांच्या प्रगतीचा गाजावाजा विपुल प्रमाणात होत असल्याने आणि बाह्य दृष्टीला त्याचे प्रलोभन विशेष आणि नैसर्गिक असल्याने अध्यात्मविद्येचे श्रेष्ठत्व सुशिक्षित आधुनिक मनाला पटत नाही. दुसरे महत्त्वाचे कारण म्हणजे इतर शास्त्रीय विद्येचे परिणाम सर्वांना सुलभ आणि त्वरित मिळत असल्याने त्याचे महत्त्व बहुजनांना अधिक वाटले तर त्यात नवल नाही.

मग आपल्या द्रष्टया पूर्वजांनी अध्यात्मविद्येस एवढे महत्त्व कशासाठी दिले असा प्रश्न येण्याची शक्यता आहे त्याचे उत्तर दोन भागात द्यावे लागेल. त्यासाठी प्रथम अध्यात्म म्हणजे काय याची व्याख्या अगदी थोडक्यात पाहुया.

भगवंतानी स्वतःच आठव्या अध्यायात अध्यात्म शब्दाची जी व्याख्या सांगितली आहे.ती अशी की कोणत्याही वस्तूचा जो परमं म्हणजे श्रेष्ठ मूलभूत स्वभाव ते अध्यात्म होय जीवाचे केंद्रभूत तत्त्व हेच परमश्रेष्ठ आत्मतत्त्व असल्याने आत्म्याबद्दलचे अज्ञान, जीवाच्या मूलभूत तत्त्वाचे भाव जाणण्याचे ज्ञान, अर्थात आत्मज्ञान प्राप्त करून घेणे हेच अध्यात्म होय; आणि म्हणूनच आपणांस आपले सूक्ष्मज्ञान प्राप्त करून घेण्यासाठी जड साधनांपेक्षा सूक्ष्म साधनेच का आवश्यक आहेत याचा उलगडा आपोआपच होतो. हे ज्ञान श्रेष्ठ कसे ते आता पाहू या.

अध्यात्मविद्येचे पहिले आणि महत्त्वाचे श्रेष्ठत्त्व हेच की त्या विद्येचे ज्ञान झाले असता जगात जाणावयाचे असे काही रहातच नाही. "एक जाणले असता सर्व जाणले जाते" अशी जर कोणती विद्या असेल तर ती विद्या म्हणजे अध्यात्मविद्या होय; म्हणून सर्व विद्यांमध्ये हीच श्रेष्ठ विद्या होय. समर्थांनी स्पष्टच म्हटलेआहे की "आपणासी ओळखो जाता अंगी बाणे सर्वज्ञता ।। हल्ली प्रत्येक विद्येचे व पोटविद्येचे 'स्पेशॅलिस्ट किंवा तज्ज्ञ फार प्रमाणात आढळून येतात परंतु त्यांना त्याच विद्येतील इतर उपशाखांचे जुजबी ज्ञानही कित्येक वेळा असत नाही हे लक्षांत घेतले म्हणजे अध्यात्मविद्येचे महत्त्व आपो-आपच स्पष्ट होते.

दूसरे महत्त्वाचे श्रेष्ठत्व असे की आपल्या जन्मापूर्वीचे आपणास काहीही ज्ञान नसते व मृत्यूनंतर काय होते याचीही आपणास यत्किंचितही माहिती असत नाही. आपला जन्म मरणाचा प्रवास केव्हा सुरू झाला व कुठपर्यंत तो चालेल, तो कसा थांबवावा याबद्दल आपले ज्ञान शून्यता असते. मग त्यातला त्या साखळीतला एक दुवा म्हणजे जे आपले आयुष्य त्या आयुष्यात उपजीविकेचे साधन म्हणून शिकलेली कोणती विद्या अथवा संपत्ती इतर मागल्या पुढल्या प्रवासाला उपयोगी येऊ शकेल या दृष्टीने विचार केला म्हणजे एकच विद्या कायम आपल्याबरोबर राहून आपणांस प्रकाश दाखविण्यास योग्य अशी आहे. ती अध्यात्मविद्याच फक्त आहे म्हणून तिचे श्रेष्ठत्त्व इतर विद्यापेक्षा अनंत पटीने अधिक मानले गेले.

आपल्या बाह्य व जड दृष्टीला सूक्ष्माचे ज्ञान अर्थातच होणे शक्य नाही. त्यासाठी सूक्ष्म ज्ञान पैदा करून देणारी सूक्ष्म दृष्टी हवी. ज्ञानाची देवता जी गणपती त्याचे डोळे हे अतिशय सूक्ष्म आहेत असे शास्त्रात ते वर्णन आहे ते याच हेतूने. ज्ञानाच्या देवतेचे जर सूक्ष्म नेत्र नसले तर सूक्ष्म ज्ञान पैदा होणार कुठून? जड दृष्टी ज्याप्रमाणे अध्यात्माला उपयोगी नाही त्याचप्रमाणे जड वृत्तीही उपयोगी पडत नाही. वृत्तीसुद्धा सूक्ष्मच हवी. आता येथे एक मोठा महत्त्वाचा मुद्दा ध्यानात घ्यावयास हवा की कोणतीही शक्ती किंवा वृत्तीही जितकी सूक्ष्म तितक्याच प्रमाणामध्ये तिचा व्यापकपणा वाढत असतो आणि म्हणून अत्यंत सूक्ष्म दृष्टी, सूक्ष्मतम दृष्टी हीच अत्यंत व्यापक असू शकते. अध्यात्म दृष्ट्या सर्व जगताला व्यापून टाकणारे जे तत्त्व त्याला ब्रह्म परब्रह्म असे म्हणतात आणि आपल्या तालूवर ब्रह्मरंध्र म्हणून योगशास्त्रदृष्ट्या जे रंध्र मानले जाते ते अतिशय सूक्ष्मतम आहे म्हणजे एके ठिकाणी ब्रह्म हे व्यापकाहून व्यापक तत्त्व म्हणून त्याला ब्रह्म हे नाव दिले तर दुसरीकडे सूक्ष्माहून सूक्ष्म असे जे रंध्र (छिद्र) त्याला ब्रह्मरंध्र असे म्हटले आहे. म्हणजे एकच तत्त्व जितके सूक्ष्म तितकेच ते व्यापक अधिक हाच सिद्धांत प्रस्थापित होतो.

असे सूक्ष्मज्ञान हे या जगाच्या, विश्वाच्या गलबल्यात प्राप्त होण्यासाठी अनुभवी सद्‌गुरूची आवश्यकता किती आहे हे सांगावयास नकोच. ज्या मार्गाची आपल्याला,

सर्वसामान्य माणसाला अंधुकशीही कल्पना नाही, कदाचित आपल्या वाडवडिलांनाही कल्पना नसण्याची शक्यता, अशा सूक्ष्ममार्गात प्रवेश करणे सद्‌गुरूशिवाय सुतराम शक्य नाही हे सुज्ञास सांगण्याची आवश्यकताच नाही.

इतके जरी आहे तरी अध्यात्मविद्येची आवड असणारे व काहीं उपासनामार्गात आपण स्थिर आहोत असे वाटणारे मुमुक्षु सद्‌गुरूची आवश्यकताच आपणांस नाही असे म्हणताना आढळून येतात असे म्हणणारे सज्जन एक गोष्ट विसरतात की गुरूची ओढ गुरूची आवश्यकता व त्याचे अनुकरण, करण्याची वृत्ति ही अणुरेणूपासून म्हणजे प्रत्येक जड वॅस्तूपासून तो सचेतन जीवमात्रापर्यंत स्वाभाविकच दिसून येते. गुरूत्वाकर्षण हा शब्दही त्याचे प्रतीकच आहे. जीवाचा अनुकरणशील स्वभाव हेही त्याचेच द्योतकआहे. मग सद्‌गुरूंची आवश्यकता नाही हे म्हणणे किती हास्यास्पद आहे याचा विचार ज्याचा त्याने स्वतःशीच करावा यापेक्षा त्यात दुसरे काही सांगता येणे शक्य नाही.

दुसरी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे अध्यात्ममार्गात सूक्ष्मवृत्तीची व सूक्ष्म दृष्टीची काय आवश्यकता आहे याचा ऊहापोह थोडक्यात वरील परिच्छेदांत केलाच आहे. "तुका म्हणे व्हावे लहानाहुनी लहान" या संत श्रेष्ठांना च्या उक्तीचा गर्भितार्थ हाच आहे, तेव्हा सदगुरूंची प्रतीक्षा करण्याचे महत्वाचे कारण अध्यात्मदृष्टचा हेच की स्वतः कडे लघुत्व यावे दुसऱ्याचे गुरूत्व हे स्वतःकडे लघुत्व घेतल्याशिवाय मानताच येत नाही आणि म्हणूनच गुरूत्व मानणे ही परमार्थ सोपानातील आरंभाचीच पण श्रेष्ठ पायरी मानली जाते. गुरूपौर्णिमेच्या दिवशी आपल्या गुरूंचे पूजन भावनेने करण्यामागची भूमिका ही थोडक्यात अशी आहे.

## कृतज्ञता

जुलै १९७३ च्या अंकापासून श्रीसाईलीला मासिकाचे संपादकीय कामकाज श्री. दिवाकर अनंत घैसास हे पहात होते. जुलै-ऑगस्ट मराठी व इंग्रजी या दोन्ही भाषेतील अंकांचे कामकाज त्यांनी मोठ्या आनंदाने पाहिले. त्यानंतर डॉ. श्री. दि. परचुरे यांच्या समवेत व त्यानंतर जानेवारी १९७४ पासून श्री. सदानंद चेंदवणकर यांच्याही समवेत त्यांनी संपादकीय कामकाज पाहिले. आता त्यांना त्यांच्या विनंतीवरून संपादकीय कामकाजातून मुक्त करण्यात आले आहे. प्रा. अण्णासाहेब परचुरे यांच्या आकस्मिक निधनामुळे श्रीसाईलीलाच्या नियमित निघणाऱ्या अंकामध्ये खंड पडू नये म्हणून त्यांनी जे परिश्रम घेतले त्याबद्दल श्रीसाईलीला त्यांची सदैव ऋणी आहे.

## डॉ. माधवराव दाभाडे श्रीसाईचरणी विलीन

श्रीसाईलीला मासिकाचे एक मान्यवर लेखक डॉ. माधवराव दाभाडे यांचे निधन झाल्याचे शोकवृत्त कळविताना आम्हांस अत्यंत खेद होत आहे. डॉ. दाभाडे यांनी श्रीसाई-

लीलेमधून एक वाचनीय लेखमाला लिहिली होती. "देवपूजेची जरूरी" या विषयावर त्यांची एक नवी लेखमाला श्रीसाईलीले मधून सुरू होणार होती व तसा पत्रव्यवहारही झाला होता. परंतु ईश्वरेच्छा काही वेगळीच होती. डॉ. दाभाडे सध्या इंदूर येथील कला महाविद्यालयातील मराठी विभागाचे अध्यक्ष होते. ते बंगलोर येथे काही कामानिमित्त जात असताना हैदराबाद जवळील तेनाली या स्थानकावर हृदयविकाराने निधन पावले. साध्या विद्यालयीन अध्यापकाच्या नोकरीने प्रारंभ करून ते विश्वविद्यालयातील विभागाध्यक्षपदापर्यंत पोहोचले होते. त्यांनी संत वाङमयावर हिंदी व मराठीतून भरपूर लेखन केले होते. इंदूरला येण्यापूर्वी ते उज्जैनच्या विक्रम महाविद्यालयात मराठी विभागाचे प्रमुख म्हणून वावरत होते. वयाच्या अवघ्या पंचावन्नाव्यावर्षी त्यांच्यावर काळाने ही अकस्मात झडप घातली. डॉ. दाभाडे यांच्या कुटुंबीयांचे दुःखात आम्ही सहभागी आहोंत. परमेश्वर मृतात्म्यास सद्गति देवो ही प्रार्थना

—कार्यकारी संपादक

—o—

लीलेमधून एक वाचनीय लेखमाला लिहिली होती. "देवपूजेची जरूरी" या विषयावर त्यांची एक नवी लेखमाला श्रीसाईलीले मधून सुरू होणार होती व तसा पत्रव्यवहारही झाला होता. परंतु ईश्वरेच्छा काही वेगळीच होती. डॉ. दाभाडे सध्या इंदूर येथील कला महाविद्यालयातील मराठी विभागाचे अध्यक्ष होते. ते बंगलोर येथे काही कामानिमित्त जात असताना हैदराबाद जवळील तेनाली या स्थानकावर हृदयविकाराने निधन पावले. साध्या विद्यालयीन अध्यापकाच्या नोकरीने प्रारंभ करून ते विश्वविद्यालयातील विभागाध्यक्षपदापर्यंत पोहोचले होते. त्यांनी संत वाङ्मयावर हिंदी व मराठीतून भरपूर लेखन केले होते. इंदूरला येण्यापूर्वी ते उज्जैनच्या विक्रम महाविद्यालयात मराठी विभागाचे प्रमुख म्हणून वावरत होते. वयाच्या अवघ्या पंचावन्नाव्यावर्षी त्यांच्यावर काळाने ही अकस्मात झडप घातली. डॉ. दाभाडे यांच्या कुटुंबीयांचे दु:खात आम्ही सहभागी आहोंत. परमेश्वर मृतात्म्यास सद्गति देवो ही प्रार्थना

—कार्यकारी संपादक

—o—

# भगवान् वेदव्यासांची स्मृति

लेखक— आचार्य काकासाहेब कालेलकर

कृतज्ञ हिंदु समाजाने व्यासांच्या स्मृतिप्रीत्यर्थ आषाढ पौर्णिमेचा दिवस ठरवून ठेवला आहे. याच दिवसाला आपण व्यासपौर्णिमा वा गुरुपौर्णिमा म्हणतो. ख्रिश्चन धर्माचा संस्थापक जरी येशू असला तरी त्या धर्माचा प्रमुख प्रचारक संत पॉल हाच होता असे सांगतात. वैदिक धर्माचा प्रसार करणारा महत्त्वाचा धर्मप्रचारक व्यासच मानला जातो. वस्तुतः व्यास हे काही व्यक्तिवाचक नाम नाही. व्यवस्था करतो तो व्यास. अव्यवस्थित रीतीने घडलेल्या वेदसंहितेची नीट रीतीने खंडवार योजना करण्याबद्दल कृष्णद्वैपायन यांना वेदव्यास म्हणतात. उपनिषदामधील विभिन्न तत्त्वे नीट रीतीने मांडण्यासाठी बादरायण व्यासाने ब्रह्मसूत्रांची रचना केली. जगातला तत्त्वज्ञानविषयक व्यवस्थित असा हा पहिलाच ग्रंथ.

## व्यासपरंपरा

शिष्यांनी आचार धर्माबद्दल विचारणा केली त्यावेळी व्यासांनी एक छोटीशी स्मृति बनवून दिली. महाभारताची रचना तर व्यासानीच केली आहे. त्याचबरोबर धृतराष्ट्र, पांडू आणि विदुराचे वडीलहि व्यासच. या तिघांच्या घराण्यातच भारतीय युद्ध झाले. व्यासांनी हे युद्ध पाहिले. ते युद्धाच्या शेवटी सर्वांना भेटले होते. वेदांची नीट रीतीने मांडणी करणारे ब्रह्मसूत्राचे निर्माते, अठरा पुराणाचे आणि अठरा उप-पुराणांचे निर्माते व्यास एकच होते का? ते सर्व व्यास एकच होते असे कसे म्हणता येईल? प्रत्येकाचा काळ भिन्न असू शकेल. परंतु हिन्दु धर्म तरी हे सर्व व्यास एकच मानतो. आणि त्यानांच आपण हिन्दु धर्माचे आद्य उद्गाते मानतो.

व्यासांचे गुरू नारद. नारद एकाच लोकात कधीच वास्तव्य करीत नसत. त्यांचा सदैव सर्वत्र संचार असे. भूत, भविष्य आणि वर्तमान अशा तीनही काळावर त्याचा प्रभाव पडला आहे. बलराम आणि परशुराम यांच्या सारख्या चिरंतन प्रवास करणाऱ्यांनी त्यांच्यापासून प्रेरणा घेतली असावी. व्यासांना मृत्यूचा अर्थ सर्वात आधी कळला. यामुळे मृत्यूने त्यांना आपल्या सर्वव्यापी कक्षेतून वगळून चिरंजीव केले असावे.

## बदललेली परिस्थिति

आता प्रश्न असा निर्माण होतो की, आजच्या काळात गुरुपौर्णिमा मानण्याची वा गुरूची आवश्यकता आहे का?

शिक्षणकलेचा विकास झाला नव्हता, सहाय्यक ग्रंथही दुर्मिळ होते आणि सारे ज्ञान गुरूच्या मुखातूनच प्राप्त होत असे, त्यावेळी गुरूचे महत्त्व स्वाभाविक होते. परंतु आता

परिस्थिती बदलली आहे. शिक्षकांची भाषणे आज जशीच्या तशी छापून मिळतात.
त्यामुळे आज पुरातन काळातल्यासारखे गुरूचे महत्व राहिलेले नाही. तरी विद्यार्थ्याला
सहाय्य करणाऱ्या शिक्षकाचे महत्व मात्र कधीच कमी झालेले नाही. शिक्षकाचे-गुरूचे-
सहाय्य मिळाले नाही, तर शिक्षण अपूर्ण वाटेल आणि म्हणूनच सर्वत्र सर्वकाळ गुरूचे
महत्त्व कायम राहिलेले आहे.

## आध्यात्मिक क्षेत्रात

ही झाली विद्यादान आणि कलादान करणाऱ्या शिक्षकांची कथा. परंतु अध्या-
त्माच्या क्षेत्रात आत्मविश्वास प्राप्त करून घेण्यासाठी गुरूची आवश्यकता विशेष असते.
त्याचे वेगळे महत्त्व असते. सद्‌गुरूच्या प्राप्तीनंतरच ,आध्यात्मिक साधना सुरू होते असे
सामान्य लोक मानतात. गुरुदेव टागोरांचे मत यापेक्षा अगदीच भिन्न आहे. ते म्हणतात
की, खऱ्या अर्थाने कुणीच कुणाचा गुरु नसतो. संकल्प आणि श्रद्धेच्या आधारे माणसाने
जीवनयात्रेला प्रारंभ करावा. चुका होतील. जुने विचार बदलू लागतील. परंतु ईश्वराच्या
कृपेने प्रगती होत राहील. गांधीजी आणि रवींद्र यांच्या भूमिका दिसायला भिन्न भिन्न
वाटतात, परंतु त्या भूमिका एकच आहेत. पोप वा शंकराचार्य यांच्या गादीवर बसलेला
माणूस हा लौकिक अर्थाने श्रेष्ठ असला तरी त्याच्यासमोर आपले स्वतःचे अनुभव गौण
लेखणे बरोबर नाही. गुरूचा खरा शोध आत्म्याच्या शोधाबरोबरच चालू असतो.

## दत्तात्रयांचे २४ गुरु

पुराणांच्या आधारे असे दिसते कीं, दत्तात्रेयाने २४ गुरू केले होते. ज्याच्याजवळून
काही शिकायला मिळाले त्यांना ते गुरू मानीत गेले. त्यांनी पशुपक्ष्यांकडूनही ज्ञान
मिळवले. हातांतल्या दोन बांगड्या आवाज करतात म्हणून एका मुलीने हातात एकेकच
बांगडी घातली. यावरून एकाकी रहाण्याचा त्यांनी बोध घेतला आणि म्हणून त्यांनी या
मुलीला गुरू मानले. एका घारीच्या तोंडांत मांसाचा तुकडा पाहून बरेच कावळे तिच्या
मागे धावले. त्या घारीने प्रसंग ओळखला आणि तोंडातला तुकडाच फेकून दिला. ती
संकटमुक्त झाली. यावरूनही दत्तात्रयांनी बोध घेतला. ज्याला साधक मानून आपले
जीवन सुधारावयाचे आहे, त्याच्यासाठी हे सारे विश्व आणि जगांतल्या साऱ्या बऱ्या-
वाईट घटना या गुरू बनू शकतात, आपले दोष दूर करून सदगुण आणि सामर्थ्य वाढविले
पाहिजे हा सल्ला शेवटी आत्मदेवच देतो. आणि म्हणूनच भगवान बुद्धाने "आत्मोदीपो
भव' असे म्हटले होते.

## एकात्म्य

गुरू-शिष्यसंबंधांत एक वेळ अशी येते की, गुरू-शिष्य एक होतात. गुरूची वाणी
तीच शिष्याची वाणी बनते. शिख गुरूंची जेवढी भजने रचली तेवढी सारी गुरू नान-

काच्या नावाने प्रसिद्ध आहेत. भजनाच्या शेवटी 'कहे गुरू नानक' असेच येईल. सिंधी भाषेतली "सामी कविता" ही वस्तुत: सामीच्या शिष्याने लिहिली आहे. त्यात गुरूने एक अक्षरहि लिहिलेले नाही. सन्तकवि तर कायमच सारे श्रेय गुरूला देतात. गुरूबद्दल आदराची भावना वाढली की त्याग भावना वाढते की आणि तीच साधनेचे मुख्य अंग आहे.

संतवाङमयात आणि लोक साहित्यात गुरू-शिष्य संबंधावाबत बरीच माहिती मिळते. या संबंधाचा जो दुरूपयोग केला जातो त्याचेही वर्णन आहे. धनलोभी, अधिकार लोभी, शिष्याना गुरूनी कसे ताळ्यावर आणले त्याचीही उदाहरणे आहेत.

संगीत, कला, चित्रकला इत्यादि कलांच्या क्षेत्रांत गुरू-शिष्य संबंधाना आगळे महत्व होते. आजही गायकी कुठल्या घराण्याची यावर त्या गायकाची प्रतिष्ठा मापली जाते. गंडा बांधण्याबाबतही गुरू-शिष्य संबंध फार महत्वाचे असतात.

## आत्मदेव हाच खरा गुरु

परंतु आध्यात्मिक क्षेत्रात, गुरू मिळणे अपरिहार्य नाही, भगवान बुद्धाने सुरवातीला एकदोन गुरूकडून उपदेश घेतला होता हे खरे. पण त्याने समाधान न झाल्याने त्यानी स्वत:च्या चिंतनाने, सामर्थ्याने आणि समाधिस्थिति प्राप्त करून ज्ञान संपादन केले. गुरुशिवायच त्यानी ज्ञान मिळविले आणि ते निर्वाणाप्रत गेले.

याज्ञवल्क्याने अतिउत्साहाच्या भरात गुरू-बंधूंचा अपमान केला. गुरुला हे आवडले नाही. गुरूने विद्या परत मागितली. शिष्याने ती परत केली. परंतु पुन्हा सूर्याची उपासना करून त्यांनी शुक्ल यजुर्वेद प्राप्त केला. आणि मग याज्ञवल्क्यांचे आणखी शिष्य बनले.

म्हणूनच आत्मदेव हेच आपले खरे गुरू. त्यांच्याच साधनाने आपण ऐहिक आणि पारलौकिक उन्नति करून घेऊ शकू. वेळोवेळी कारणपरत्वे आपण गुरू करतो ते निराळे वा गुरूशिवायहि विद्या प्राप्त करतो ते आगळे. परंतु खरा गुरू आत्मदेवच.

साक्षात्कारी संत : योगी :

# भगवान श्री नित्यानंद स्वामी

ले. : सुभाष सदानंद चेंदवणकर

आपला भारत देश ही संत महात्म्यांची पुण्यभूमि आहे. पुरातन कालापासून आमच्या ऋषिमुनींनी, संत महात्म्यांनी सर्व जगाला सन्मार्गाचे शिक्षण देण्याचा प्रयत्न केला आहे. सर्व जगातील देशात भारताचे जे आगळे वैशिष्टच आहे ते म्हणजे त्याचा अध्यात्मवाद. ही भारताची परंपरा प्राचीन कालापासून चालत आलेली आहे. ही जी आमची पुरातन कालापासून चालत आलेली प्रवृत्ति आहे तिची प्रेरणा आम्हांला आमचे ऋषिमुनी, संतमहात्मे आणि योगी यांच्यापासून मिळाली आहे. ह्या महापुरुषांमध्ये ब्रह्मांडाला हालविण्याची शक्ति आहे. त्यांनी तपश्चरणांने अलौकिक सिद्धि प्राप्त केली आहे. या सर्व सिद्ध पुरुषांमध्ये सज्जनगडचे परमहंस श्रीधर स्वामी, अहमदनगरचे संत मेहेरबाबा, शिर्डीचे श्रीसाईबाबा, मिथिलेचे मौनी बाबा, चरित्रबनचे खाकी बाबा आणि क्षेत्र अयोध्येचे परमपूज्य वेदांतजी महाराज श्रेष्ठ आहेत.

आपल्या भाग्याने हे सर्व योगी आज विद्यमान आहेत आणि या योग्यांचेहि योगी-राज भगवान श्रीनित्यानंद हे एक थोर साक्षात्कारी संत होऊन गेले. नित्यानंद स्वामींचा जन्म कोठे व केव्हा झाला, त्यांनी योगसाधना कोठे केली यासंबंधी सविस्तर माहिती उपलब्ध नाही. अवतारी पुरुषांच्या जीवनात दिसून येणारे हे प्रश्नचिन्ह त्यांच्या बाब-तीतही दिसून येते. श्रीस्वामी तरुणपणी दक्षिण कॅनरा भागातील काननगड या गावा-पासून थोड्याच अंतरावर असलेल्या 'गुरुबन' ह्या परिचित भागात प्रथम दृष्टीस पडले. कोईमतूर शहरामध्ये एक सुप्रसिद्ध व प्रथम श्रेणीचे वकील श्री. ईश्वरप्रसाद अय्यर हे एक सूर्योपासक व परम ईश्वरभक्त होते. श्रीईश्वरप्रसादनी किराणा-मालाच्या दुकानात बसलेल्या एका मुलाला त्याची योग्यता ओळखून आपल्या घरी नेले. त्या दोघांचे एकमेकांवर फार प्रेम जडले व ते एकमेकाला गुरु मानू लागले. शेवटपर्यंत श्रीगुरुदेव आपले गुरू म्हणून श्री. ईश्वरप्रसादजी अय्यर यांचेच नाव घेत होते.

पूर्वीच्या काळी इक्केरी नावाचा राजा होता. त्याने टिपू सुलतानाचा पराभव केला. गुरुबन पासून तीन मैलांवर असलेल्या गुहाक्षेत्री असलेल्या अखंड डोंगरात श्रीनित्यानंदानी ३९ गुहा खोदल्या. या गुहाक्षेत्रात बाबांनी अष्टसिद्धीला बसण्यासाठी मांडलेले ८ दगड अजूनही दृष्टीस पडतात, या ठिकाणी बाबांनी असंख्य चमत्कार केले. ह्या क्षेत्राच्या जवळच पवित्र खुशालनगर क्षेत्री बाबांनी आपल्या वास्तव्यात एक विहीर बांधली. पडबिद्री भागातील ब्रह्मस्थान हे सर्पांनी भरलेले दाट जंगल आहे. बाबा सर्पांना येथून

जाण्यास सांगत व सर्प निमुटपणे निघून जात. या ठिकाणी वडाच्या झाडावर उभे राहून अवधूत अवस्थेत श्रीबाबा सभोवतींच्या पीडितास वडाची पाने ओरबडून देत. ही पाने खाण्यास सांगत व नवल असे की या पानांचा औषधांप्रमाणे उपयोग करणारे रोगमुक्त होत.

पुढे काननगड येथील डोंगरात गुहा तोडून त्यांनी तिथे साधकांची सोय केली व एक प्रशस्त धर्मशाळा ही बांधली.

केवळ लंगोटी घालणारा हा साधू एवढे पैसे कोठून आणतो अशी शंका पोलिसांना आली. त्यांनी श्रीगुरुदेवांना खडसावून विचारल्यावर बाबा त्यांना दरीजवळ घेऊन गेले व दरीत खोल पाणी असलेल्या भागात उडी मारून नोटांची पुडकी बाहेर काढून घेऊन आले. पोलीस चकित झाले. श्रीबाबा हे कोणालाही पाया पडू देत नसत.

एकदा बाबा तिकिटाविना रेल्वे प्रवास करीत होते. नीलेश्वर स्टेशनावर त्यांना तिकिट कलेक्टरने खाली उतरविले. चमत्कार असा की गाडी काही केल्या चालेना. अति प्रयत्न करूनही गाडी जागच्या जागी उभी राहिली. शेवटी आपल्या अकल्पित चुकीमुळे हे घडूनआले असे तिकिटकलेक्टर, गार्ड यांना आढळून आले. ही मंडळी बाबांकडे क्षमा-याचना मागूलागली.बाबा हसून म्हणाले, 'जा,गाडी चालू होईल', व गाडी चालू झाली. नंतर कासारगोड स्टेशनात बाबांनाटी. सी.ने तिकिट मागितले तेव्हा बाबांनी हजारो तिकिटांचे पुडके टी. सी. च्या हाती दिले. तो बिचारा घाबरला.याच गावी श्रीबाबा एका सावकाराच्या गावी रहावयास गेले. एके दिवशी या सावकाराने बाबांना हनुमंताशी बोलत असताना पाहिले. सद्गुरूंच्या हे लक्षात येताच त्यांनी त्यास सांगितले की ही घटना कोणास सांगू नकोस. तरी सावकाराने स्वपत्नीस ही घटना सांगताच बाबा क्रोधाविष्ट झाले. बाबा लगेच तेथून निघाले. तिथल्या पावंजा नदीवर येऊन पावंजा नदीच्या पैल-तीरावर जाण्यास काही साधन नसल्यामुळे बाबा पाण्यावरून चालत गेले. बाबांनी कुबंअ गावी सागरतीरी खेळत असलेल्या एका बालकाला उचलले व सरळ समुद्रात फेकूनदिले.त्या मंडळींना बाबांचा राग येऊन ते बाबांना मारण्यास धावले, पण बाबांनी हसून समुद्राकडे अंगुलिनिर्देशकेला; तो काय! ते बालक हसत,धावत समुद्रातून चालत किनारी येत होते. आपच्चा नावाच्या एका दुष्ट अवलियाने त्यांना विषमिश्रित तंबाखू दिला. ही गोष्ट माहित असूनही श्री बाबांनी तो पचविला. पुढे त्या अवलियास पश्चात्ताप झाला.

उडपी गावात एकदा तेथील रथोत्सव चालू असता बाबांनी रथावर माती फेकली. त्याचे सुवर्णात रूपांतर झाल्याचे पाहून सारा गाव मंत्रमुग्ध झाला. काननगड येथे ध्यानाकरिता निवडलेल्या भुयारात ते ध्यानस्थ बसत. तेथे रहाणारा माळी तेथे आला, व बाबांना निघून जा असे सांगू लागला. बाबांना स्वस्थ पाहून माळी त्यांना शिवीगाळ करू लागला. 'मला त्रास देऊ नकोस, मला ध्यानास अनुकूल अशी जागा आहे', असें सांगून

सुद्धा माळी ऐकेना. माळयाच्या खाकेत लोखंडी छत्री होती. कसला देव व कसले काय, नीघ येथून, माळी दरडावायचा. त्यांनी ती छत्री ओढली. व त्याच्या पायावर मारली, देवा, देवा करीत माळी ओरडू लागला. माळयाच्या पायाला लोखंडी पत्रा लागून रक्त आले. त्याने बाबांवर फिर्याद केली. काही दिवसांनी बाबा नदीवर गेले असतांना माळयाने केलेल्या फिर्यादीचे समन्स घेऊन पोलिस आला. याच वेळी बाबांनी कमरेस अडकविलेली लंगोटी सोडून एका खडकावर आपटली व ते दिगंबर अवस्थेत संचारू लागले. इकडे केस उभी रहायची वेळ आली. ज्या न्यायमूर्तीपुढे खटला चालणार होता तो न्यायाधीश आरोपीचे नाव "श्रीनित्यानंद स्वामी" ऐकून क्षणभर किंकर्तव्यमूढच झाला. न्यायमूर्तीच्या लहानपणी त्याला सद्गुरुच्या चरणी ठेवून त्यांचा आशीर्वाद घेतला होता व त्यांच्या कृपेनेच न्यायमूर्तीस ऊर्जितावस्था प्राप्त झाली होती. त्यास्तव न्यायाधीश अस्वस्थ झाला. दरम्यान भक्तांनी केसच्या नकारावाबत अर्ज दिल्लीला पाठविले. बाबा मुक्त होऊन प्रथम चिराबाजारात राहिले. नंतर कुर्ल्याचे पाण्याचे पाईप ज्या भागातून जातात त्या निर्जन भागात राहू लागले. बाबांनी कुर्ल्यात सुद्धा अनेक चमत्कार केले. भोवताली गर्दीचे वलय होई. त्यामुळे बाबा कन्हेरी गुंफेत राहून वज्रेश्वरीहून ते गणेशपुरीस आले. गणेशपुरी येथील वैकुंठाश्रमाच्या नजिकच्या कुंडाजवळ भगवान श्रीशंकराचे पुरातन देवालय आहे. त्याठिकाणी जो कुणी रात्री मुक्काम करी त्याला भयानक स्वप्ने पडत. त्यास वृक्षवर्षावासारखा भास होत असे. १९२७ च्या सुमारास एक गुजराथी साधू निर्भयपणे त्या मंदिरात राहू लागल्याचे पाहून साऱ्या गावकऱ्यांना आश्चर्य वाटले. त्यावर विश्वास बसला. एके दिवशी हा साधू भल्या पहाटे उठून देवळापासून दूरच्या घरापर्यंत बोंबा मारत धावू लागल्याचे पाहून लोकांना वाटले की, या साधूला वेड लागले. गांधी नावाच्या वृद्धाने साधूस विचारले, "मुला काय पाहिजे? साधूने ५ मोठे खिळे मागितले. गांधींनी खिळे आणून दिले. तो साधू परतताना वैकुंठाश्रमाच्या रस्त्याने एकेक खिळे ठोकीत गेला. एक खिळा त्याने कैलासाजवळ ठोकला. अशा रीतीने फर्लांगावर ते ५ खिळे ठोकीत गेला. सर्व गावकरी चकित झाले. त्या सर्वांना उद्देशून हा साधू म्हणाला, "बाबांनो या रस्त्याने पुढील वर्षी एक महापुरुष येणार आहे; म्हणून रस्ता आखून ठेवतो. त्याची भविष्यवाणी कोणास त्यावेळी कळली नाही. तदनंतर तो साधू अचानक गणेशपुरी सोडून गेल्यावर दुसऱ्याच वर्षी श्रीबाबांचे आगमन झाले. श्रीबाबा इकडे जीवनाच्या अंतापर्यंत स्थायिक झाले! लाखो लोकांचा उद्धार करीत असताना हे खेडे शाळा, दवाखाने, इस्पितळ, म्युझियम, उपहारगृहे आदी इमारतींत गजबजले. या खेड्यातील आदिवासी व कुणबी समाजाला संस्कृतीचा सोनेरी अलंकार घासून भक्तीच्या पाण्याने बाबांनी त्यांची मने भिजविली.

अशा प्रकारे १९६१ पर्यंत हजारो मुमुक्षूंना मोक्षाचा मार्ग दाखवीत असतानाच महाराजांनी १९६१ च्या गुरूपौर्णिमेस समाधी घेतली. त्यांच्यानंतर श्रीमुक्तानंद महाराज गणेशपुरीचे कार्य अधिकच जोमाने चालवीत आहेत. आज येथे भव्य प्रेक्षणीय नित्यानंद मंदिर उभारण्यात आले आहे.

# "कोणी कांही म्हणा"

लेखक-श्री. बी. आर. काकडे, दहीसर

कोणी कांहीं म्हणा-कोणी कांहीं म्हणा ।।
मी राम पाहिला-श्रीराम पाहिला ।। ध्रु०।।
अन्य नयना हा फकीर साई ।।
मम नयना रघुपति राम ।।
रघुपति राम-सीतापति राम ।।
जानकीवल्लभ राम-धनुर्धारी राम ।।
राम पाहिला-मी राम पाहिला ।।१।।
अन्य नयना हा शिरडीवासी ।।
मम नयना अयोध्यावासी ।।
अयोध्यावासी राम-प्रभू श्रीराम ।।
दशरथनंदन राम-कौसल्यासुत राम ।।
श्रीराम-जयराम-जय जय राम पाहिला ।।२।।

वर प्रमाणे श्री सदगुरू बाबांचे शिरडी येथील दरबारात (मशीदीत) एक मोठ्या भक्त मंडळींचे मेळाव्यात एक मद्रासी बाई मोठमोठ्याने भजन करीत आरती करीत होती. सदरहू बाईच्या या विचित्र वागणुकीने सर्व भक्तजन आपापले मतभेद विसरून तिचे भजनात तल्लीन होऊन तेही रामरूप-झालेले दिसत होते. हे सर्व दृश्य श्री सदगुरू साईबाबांचे एक महान भक्त दासगणू महाराज यांनी जेव्हा पाहिले तेव्हा ते, भक्तजनांना उद्देशून म्हणाले--हे भक्तजनहो! पहा-पहा-या बाईकडे पहा--ती मोठमोठ्याने काय सांगत आहे. आपल्या सर्व भक्त मंडळींचा गेल्या बराच वेळा पासून "श्री सदगुरू साईबाबा" वरील आपापले श्रद्धायुक्त भक्तीचा जो आढावा घेऊन "बाबा" आमचे असे प्रत्येक जमातीतील भक्तजन जे आवर्जून सांगत आहेत ते लक्षात घ्या. बाबा महाराष्ट्रीय लोकांचे किंवा गुजराथी लोकांचे-उत्तर भारतीय, पारसी, इसाई किंवा गोवेकर- लोकांचे किंवा बाबा मद्राश्यांचे? हा भेदभाव विसरून आपण सर्व लोकांनी काहीही म्हटले तरी या बाईचे दृष्टीने बाबा रामरूपात दिसत आहेत. श्रीराम हे श्रीविष्णूचे दशावतारा पैकी "सातवे अवतार" व या बाईचे म्हणण्याप्रमाणे बाबा जर तिला साईरूप "रामरूपात" दिसत आहेत व या तिचे म्हणण्यात आपण सर्वजण आपापले मागणीचे मत बाजूला ठेवून एकरूप होऊन श्रद्धायुक्त भक्तीने तल्लीन झाला आहांत तेव्हा माझी आपणा सर्व भक्त मंडळीना एकच विनंती आहे की- आपण सर्वजण आपापले

तर्कवितर्क बाजूला ठेवून, एकच होऊन, बाबांना हाक मारू या. श्री दासगणू महाराजांनी वरप्रमाणे सर्व भक्त मंडळींना विनंती करून :--

**याहो याहो अवघे जन ।।**
**करा बाबांसी वंदन ।।**
**गणू म्हणे बाबा साई ।।**
**धांव पाव माझे आई ।।**

याप्रमाणे श्री सदगुरू साईबाबांचा "जयघोष" करून, सर्व भक्तमंडळींना एक नाविन्यपूर्ण "आदर्श" भक्ति करण्यासाठी घालून दिला. कारण श्रीसदगुरू साईबाबा यांचा "अवतार" एकाच जमातीसाठी किंवा एकाच धर्मासाठी झाला नव्हता; हे त्यांचे शिरडी येथील साठ पासष्ट वर्षांचे दीर्घ मुदतीचे वास्तव्यावरून दिसून येते. प्रथम दर्शनी वयाचे सोळावे वर्षी बालरूपात प्रगट होऊन शिरडी येथील ग्रामस्थ लोकांना एक प्रकारचा झटकाच दिला त्यावेळी या बालरूपी मूर्तीला पाहून जो तो तर्कवितर्क करू लागला. एवढे लहान वयात ही मूर्ती या ठिकाणी "निंबवृक्षा" खाली एकटीच ध्यानस्थ का बसली आहे? हे कोणाचे मूल असावे? हिंदु आहे का मुसलमान? एक ना अनेक असे हजार प्रकारचे विचार लोकांचे मनात नाचू लागले. कोणी काही म्हणाले, कोणी काही म्हणाले, परंतु "बाळरूपी" बाबा काही औरच अवलिया निघाले. श्रीखंडोबारायांचे एक भक्त व पुजारी "म्हाळसापति" यांचे अंगात श्रीखंडोबाचे वारे येऊन हे बालरूपी स्वामी कोण आहेत त्याचा खुलासा झाला.

या बालरूपी बाबांचे गुरूंची समाधि या झाडाखाली आहे व म्हणूनच हे बालयोगी या ठिकाणी आले आहेत. त्या प्रमाणे शिरडी गावातील लोकांनी, "दाखविलेल्या जागी" कुदळ मारली. आश्चर्य काय झाले? खरोखरच त्या ठिकाणी एक समाधिस्थान दिसले. आता पुढे काय करावयाचे हा मोठा प्रश्न लोकांपुढे उभा राहिला परंतु हे बालयोगी ध्यानस्थ बसले होते तो पावेतो लोक शांत बसले व जेव्हा बालयोग्यांनी डोळे उघडले तेव्हा अतिनम्रपणे दोन्ही हात जोडून सापडलेल्या समाधीचे पुढे काय करावयाचे हा प्रश्न विचारला, बालयोगी बाबांनी सदर सापडलेली समाधी पुन्हा बंद करून टांकावी असे सांगितले व पुन्हा डोळे बंद करून ध्यानस्थ बसले. या प्रमाणे दिवस गेला-रात्र झाली मध्यरात्र उलटली तरी सुद्धा हे बालयोगी डोळे उघडत नाहीत असे पाहिले तेव्हा लोक (जनसमुदाय) कंटाळले. रात्रीच्या झोपेने त्यांचेवर झोप घातली व लोकांनी जरा डोळे मिटले न मिटले तोच ही बालमूर्ती अदृश्य झाली. लोकांनी पुन्हा जेव्हा पाहिले तेव्हा त्यांना मोठा धक्काच बसला. मोठ्या आश्चर्याने या बाळरूपी बाबांचा शोध शिरडी-पासून पाच दहा कोस चारी बाजूस केला पण व्यर्थ! शिरडीवासी ग्रामस्थ फार नाराज झाले. या प्रमाणे एक मोठा "बारा वर्षांचा" काळ निघून गेला.

भर तारुण्यात साधारणतः वयाचे अठ्ठाविसावे वर्षी श्रीसदगुरु साईबाबा हे एका मुसलमानी लग्नाचे "वऱ्हाडा" बरोबर शिरडीत आले. हे वऱ्हाड धुपखेड्याचे एक पाटील -"चांदभाई" यांच्या बायकोचे भाच्याला शिरडीची मुलगी नक्की झाल्याने हे वऱ्हाड शिरडीस आले. चांदभाई पाटलांची एक घोडी हरवली होती व तिचे शोधांत चांदभाईनी चारपाच दिवस घालवून निराश होऊन ते परत आपले गावाकडे "धुपखेड्याकडे" निघाले होते. त्यावेळी एका झाडाखाली एक तरुण फकीर (मुसलमानी वेषात डोईस फडके व अंगास कफनी) चांदभाईस मोठ्याने हांक मारताना दिसले. प्रथमतः चांदभाईस थोडीशी भीती वाटली परंतु जेव्हा या तरूण फकीराने त्यांना त्यांची घोडी मिळवून दिली व चिलीम पिण्यास पाणी व विस्तव ज्या प्रकारे प्रगट केला त्या वेळेस चांदभाईस मोठे आश्चर्य वाटले व आपणास एक "अवलिया" भेटला हे पाहून त्यांनी त्या फकिरास धुपखेडे येथे आपले घरी घेऊन जाण्याची गळ घातली. दयाळू फकीराने त्यांची इच्छा (मुराद) पूर्ण केली व वर लिहिल्या प्रमाणे चांदभाईचे घरी लग्नाचे वऱ्हाडाबरोबर हे "तरुण फकीर" शिरडीस आले.

श्री खंडेराव मंदिराचे आवारात हे लग्नाचे वऱ्हाड आले तेव्हा श्रीखंडोबाचे पुजारी म्हाळसापति सामोरे जाऊन या तरुण फकीरास "आवो साईबाबा" असे उद्देशून त्यांचा बहुमान केला. लग्नसोहळा आटोपल्यावर चांदभाई लग्नाची वरात घेऊन धुपखेड्याकडे परत गेले व बाबा शिरडीत राहिले.

बारा वर्षांचा दीर्घ काल गेल्यावर सुद्धा या तरुण फकीराने निंबवृक्षाखाली आपले गुरूची समाधी आहे असे जेव्हा शिरडी येथील लोकांना सांगितले तेव्हा त्यांना मोठा धक्काच बसला. या लोकांमध्ये "बारा वर्षां" पूर्वी ज्या लोकांनी बालयोगी यांचे रूप पाहिले होते, त्यांना मोठे आश्चर्यच वाटले व मोठ्या कौतुकाने ते या तरुण फकीराकडे पाहू लागले त्यांचा सत्कार करून एक दिलाने त्यांचे कौतुक करून म्हणू लागले.

**"सोलह सालकी उम्रमें आये ।।**
**शिरडी लोगने आपको पाये ।।**
**बालस्वरूप देखकर वे ।।**
**मनमें सुहाते हैं ।।**
**हम कथा सुनाते है ।।**
**शिरडीके साईबाबाकी ।**
**हम कथा सुनाते हैं ।**
**श्रीसद्‌गुरू साईबाबाकी ।।**
**हम कथा सुनाते हैं ।।**

कोणी काही म्हणा-कोणी काही म्हणा श्रीसदगुरू साईबाबा हे शिरडी येथे वर प्रमाणे जाहीर झाल्यानंतर एक प्रकारचे नवीन वातावरण सुरू झाले. प्रथमतः जरी

श्रीसदगुरू साईबाबांना आपले अवतार कार्य दाखविण्यास थोडाफार त्रास झाला तरी जेव्हा पाणी ओतून पणत्या जाळल्या तेव्हा हे "अवतारी" सत्पुरुष आहेत असे त्यावेळी लोकांना पटले व जो तो श्रीसाईबाबांना शरण गेला.

आज श्रीसदगुरू साईबाबांनी समाधी घेऊन पंचावन वर्षे होऊन गेली तरी श्रीसद्‌गुरू साईबाबांचे दरबारात पणत्या लावण्याचा कार्यक्रम अतिउत्तम प्रकारे होत असतो व कोणी काहीही म्हटले तरी सर्व भक्त मंडळी एकरूप होऊन-एक दिलाने-एक मताने तल्लीन होऊन म्हणतात:

**मेरे बाबाके मसजीदमें दिये जले ॥**
**मेरे साईके मंदिरमें दिये जले ॥**
**यह मंदिरमें -मसजीदमें दिये जले ॥**
**यह मसजीदमें-मंदिरमें दिये जले ॥ ध्रु ॥**
**मेरे बाबाकी मसजीद है प्यारी ॥**
**जिसमें रहे ती बाबाकी छवी प्यारी ॥**
**हरदम दिखती है वो निराली ॥१॥**
**आते है जहीद हमेशा बहारसे ॥**
**पाते है प्यारको ये बाबाके दिलसे ॥**
**लेते हैं आशीश ये बाबाकी अपने ॥२॥**
**कहता हैं दास काली अपने दिलसे ॥**
**सेवा करो हरदम ये बाबाकी अपने ॥**
**दुआ चाहता हूं बाबा हमेशा तुम्हारी ॥३॥**
**मेरे बाबाके मसजीदमें दिये जले ॥**
**मेरे साईके मंदिरमें दिये जले ॥**
**यह मंदिरमें -मसजीदमें दिये जले ॥**
**यह मसजीदमें-मंदिरमें दिये जले ॥४॥**

वर प्रमाणे जेव्हा सर्व जातीचे लोक जात भेद वर्ण न पहाता श्रीसद्‌गुरू साईबाबांना व त्यांचे मशीदीस (द्वारकामाईस) अति नम्रतेने मान देतात तेव्हा असे वाटते:

**कोणी काही म्हणा ॥**
**कोणी काही म्हणा ॥**
**मी राम पाहिला ॥**
**श्रीराम- पाहिला ॥**
**जयराम-पाहिला ॥**
**जय जय राम-पाहिला ॥**

# श्रीसाईबाबांच्या पुतळ्यांचे शिल्पकार
## —श्री. हरीश तालीम

ले. सदानंद चेंदवणकर



मुंबापुरीत कॉंग्रेस हाऊस जवळ डी. जी. टी. हायस्कूल नावाची एक शिक्षण संस्था आहे. या संस्थेकडे जाणाऱ्या मार्गाच्या प्रवेशद्वारापाशीच एका शिल्पकाराचा अद्ययावत सुख सोयींनीं सुसज्ज असा स्टुडिओ आहे. त्याचे नाव आहे "तालीम आर्ट स्टुडिओ" या स्टुडिओत जाऊन डोकावलात तर त्या स्टुडिओच्या दोन्ही विशाल दालनात लहान मोठे, उंच-मोठे अर्ध अधिक-सबंध असे देव-देवतांचे, संत-योगी यांचे, देशभक्त-राष्ट्रपुरुषांचे पुतळे दिसतील. हे सर्व पुतळे एका तरुण शिल्पकाराच्या हातचे आहेत. त्याचे नाव आहे श्री. हरीश बाळाजी तालीम. श्री. हरीश यांचे वडील श्री. बाळाजी वसंत हे मुंबईतीलच नव्हे तर महाराष्ट्रातील एक विख्यात शिल्पकार होते. ते डिसेंबर १९७० मध्ये स्वर्गवासी झाले.


श्री. हरीश यांचा जन्म १३ जुलै १९२४ रोजी मुंबईत झाला. त्यांचे प्राथमिक ते मॅट्रिक पर्यंतचे शिक्षण मुंबईलाच झाले. आपल्या निवास स्थानालगतच्याच डी. जी. टी. हायस्कूल मधून ते १९४८ साली मॅट्रिक झाले. पुढे त्यांनी विश्वविद्यालयीन शिक्षण घेतलेच नाही. त्यांचे वडील त्याकाळी एक उत्कृष्ट शिल्पकार होते. तेव्हा त्यांच्या हाता-

खालीच त्यांनी शिल्पशास्त्राच्या अंगोपांगाचे संपूर्ण शिक्षण घेतले. त्याबरोबरच विख्यात चित्रकार श्री. सावळाराम हळदणकर यांचेपाशी त्यांनी मोठ्या आवडीने पेंटिंगचे शिक्षण घेतले. फुरसतीच्या वेळात ते आपल्या वडिलांना हरप्रकारची मदत करीत असत. वडिलांच्या निधनानंतर सर्व प्रकारची कामे ते स्वतः जातीने करतात.

श्री. हरीश स्वतः श्रीसाईबाबांचे भक्त आहेत. बाबांचे नामस्मरण केल्याशिवाय ते दैनिक कामाला सुरुवातच करीत नाहीत. शिरडीच्या श्रीसाईबाबांचा समाधिमंदिरातील इटालियन मार्बलचा अत्युत्कृष्ट पुतळा त्यांच्या वडिलांनी तयार केला असला तरी त्याकामी थोडाबहुत हातभार श्री. हरीश यांचा लागलेला आहे. हा अप्रतिम पुतळा सव्वा पाच फूट उंच असून तीन फूट रुंद आहे. गिरगावातल्या श्रीसाईधाम मधल्या पुतळ्याच्या कामी त्यांचे श्रम खर्ची पडलेले आहेत. अगदी स्वतंत्रपणे मात्र त्यांनी शिर्डीच्या गुरुस्थानाजवळच बसविलेला बाबांचा पुतळा तयार केला आहे. माहीम येथे लिमये बाबांच्या साईमंदिरातील पुतळा त्यांचेच कसब आहे. नागपूर येथे विदर्भातील शिरडी होत आहे तिथल्या साई मंदिरात नव्याने बसविण्यात येणारा पुतळा आणि दिल्लीच्या साईमंदिरातील पुतळा श्री. हरीश यांच्या हस्तकौशल्याचे, कसबाचे प्रतीकच म्हटले पाहिजे. श्री. हरीश हे बाबांचे पुतळे बनवितात व त्याशिवाय इतरही. मुंबईच्या हुतात्मा चौकातील हुतात्मा स्तंभ, गेटवे ऑफ इंडिया जवळील अश्वारूढ छत्रपती शिवरायांचा, पिलानी, धुळे, मोंबासा, पुणे येथील म. गांधीचा, पणजी, गुजरात येथील कस्तुरबांचा, यवतमाळमधील लो. टिळकांचा कल्याण व गोवा येथील पं. नेहरूंचा. पुणे व मुंबई येथील आचार्य अत्रेंचा. मद्रास मधील राजाजींचा, कलकत्यातील टागोरांचा असे एक ना दोन शेकडो पुतळे त्यांच्या हस्तकौशल्यातून उतरले आहेत. जालना (मराठवाडा) येथे बसविण्यात आलेला शिवाजीचा साडे बारा फूट उंचीचा ब्रॉंझचा पुतळा हे त्यांचे आतापर्यंतचे मोठ्यात मोठे कार्यकौशल्य आहे. सबंध दिवसभर आणि रात्री सुद्धा श्री. हरीश आपल्या स्टुडिओत अक्षरशः तल्लीनतेने कार्यात गर्क असतात. ते ब्रॉंझ, प्लास्टर व मार्बलचे पुतळे तयार करतात. एक पुतळा संपूर्ण तयार करण्यास त्यांना सुमारे चार महिने काळ लागतोच. ज्या पुतळ्याची ऑर्डर असेल त्या पुतळ्याची प्रथम प्लास्टरची प्रतिकृती तयार करावयाची असते. ती मालकाला पसंत पडली म्हणजे मग त्याबरहुकूम योग्य तो पुतळा तयार करावा लागतो. यापाठीमागे खूप कष्ट असतात. सामान्य जनांच्या ते लक्षात येत नाहीत. श्री. हरीश शास्त्रीय संगीताचे मोठे शौकीन आहेत. भीमसेन जोशी, रामदास कामत व लता हे त्यांचे आवडते कलाकार होत. श्री. तालीम यांचा विवाह १९६२ साली झाला. त्यांच्या पत्नी सौ. शीला या पूर्वाश्रमीच्या कु. सरोज शेट्ये. राजू नितीन व शिल्पा अशी अपत्यसंपदा त्यांना लाभलेली आहे.

शिरडीच्या द्वारकामाईत चित्रकार जयकरांनी काढलेल्या बाबांच्या तसबिरीहुकूम बाबांचा एक बैठा पुतळा तयार करण्याची कामगिरी श्री. हरीश यांच्यावर येऊन पडली आहे. ती ते यशस्वी पणे पूर्ण करतील यात शंकाच नाही.

# मौल्यवान 'ओम' खडा



मुंबापुरीत माटुंगा विभागात श्री. बाबुलाल जयरामभाई शहा नावाचे एक उद्योगपती रहातात. ते मोठे भाविक, परमेश्वरभक्त व दयाळू अंतःकरणाचे आहेत. ते मूळ राजकोटचे. मुंबई व राजकोट येथे त्यांचे मोटारींना लागणाऱ्या बॅटरीज्, बल्बज व तत्सम वस्तूंचे उद्योग व्यवसाय आहेत. आपल्या उद्योग-व्यवसायानिमित्त ते अधून मधून राजकोट येथे जात–येत असतात. असेच एका दुपारी ते राजकोटला जाण्यासाठी आवश्यक असलेले तिकिट बुक करण्यासाठी म्हणून निघाले असता चर्चगेट स्टेशनजवळ त्यांना एक साधू भेटला. त्याने त्यांना एक खडा भेटी दाखल दिला. त्यांनी तो स्वीकारला व बक्षिस म्हणून काही पैसे देऊ केले पण त्या साधूने ते घेतलेच नाहीत.

घरी आल्यावर बाबूलालभाईंनी साधूने दिलेल्या त्या खड्याचे निरीक्षण केले तर त्यात त्यांना 'ओम' दिसू लागले. बृहत् दर्शक कांचेच्या सहाय्याने त्यांनी आणखीन बारकाईने निरीक्षण केले तो काय आश्चर्य त्या खड्यात त्यांना पाच 'ओम' दिसू लागले, व ते अगदी स्पष्टपणे!

हा अजब खडा त्यांनी काही तज्ञ जाणकारांना दाखविण्याचे ठरविले. रात्री ते झोपी गेले. त्या रात्री स्वप्नात त्यांना एक संत फकीर दिसू लागला. हा संत फकीर

म्हणजे सद्‌गुरू श्रीसाईबाबा होत याची सकाळी उठल्याबरोबर त्यांची पक्की खात्री झाली व ते त्या दिवसापासून श्रीसाईबाबांची उपासना व भक्ती करू लागले. यापूर्वी ते साईभक्त नव्हते.

श्रीबाबूलालभाईना लाभलेला हा अपूर्व खडा पारदर्शक असून तो पांढरट ग्रे वर्णाचा आहे. पुण्याच्या डेक्कन कॉलेजातील पुराणवस्तु संशोधन केंद्राने तर हा खडा अत्यंत दुर्मिळ असल्याचे आपले मत व्यक्त केले आहे. तो सुमारे पाच ते सात कोटी वर्षांपूर्वीचा असावा असे तज्ञांचे म्हणणे आहे. वॉशिंग्टन मधल्या अमेरिकन नॅशनल म्युझियम ऑफ नॅचरल हिस्टरी स्मिथसोनियन इनस्टीटयूटनेही हा खडा फार फार प्राचीन असावा असा अभिप्राय नुकताच व्यक्त केला आहे. या खडयात 'सत् ब्रह्म ओंकार,' 'चित्त ब्रह्म ओंकार' व 'आनंद ब्रह्म ओंकार' अशा 'ओंम' चे एकत्र दर्शन घडते. असा हा नवलाईचा खडा म्हणजे आपल्याला श्रीसाईबाबांचा प्रसाद आहे असे श्री. बाबूलाल भाई समजतात व तो आपल्या देवघरात ठेवून त्याला नित्य नेमाने फूल वहातात. त्या खडयासभोवती त्यांनी आंगठीसारखे एक सुवर्णाचे वर्तुळही करून घेतले आहे.

# नाम-संकीर्तन

१ नाम अमोल पण बिनमोल आहे.
२ नामाच्या ठिकाणी वर्णभेद नाही.
३ नामाच्या ठिकाणी स्त्रीपुरुष भेद नाही.
४ नामाला काळवेळाचे बंधन नाही.
५ नामाला विद्वत्तेची जरूरी नाही.
६ नाम स्वयंपूर्ण आहे.
७ नाम हे प्रत्यक्ष परब्रह्म आहे.
८ नामस्मरणाने सत्वगुणाची वाढ होते.
९ नामस्मरणाने पश्चात्ताप उत्पन्न होतो.
१० साधनात साधन म्हणजे भगवंताचे नाम.
११ जो नामात राहिला त्याचा वासनाक्षय झाला.
१२ नामात नाम रामनाम-सर्वसुखनिधान.
१३ उपासनेचा सोपा मार्ग म्हणजे भगवन्नामस्मरण.
१४ नामस्मरणाने सर्व दुरितांचा नाश होतो.
१५ सुखाने प्रपंच करा परंतु भगवंताचे नामस्मरण विसरू नका.
१६ जगात असे कोणतेही पाप नाही की जे नामासमोर राहू शकेल.
१७ भगवंताचे नामस्मरण हा सर्व तीर्थांचा राजा आहे.
१८ भगवंताच्या स्मरणामध्यें शाश्वत आनंद साठवला आहे.
१९ रामनाम हा देहबुद्धी जाळणारा अग्नी आहे.
२० ज्याला लवकर भगवंत गाठायचा आहे त्याने एका नामाची कास धरावी.

संग्राहक – बाळकृष्ण धामणकर

—x—

# साईनाथ

## ( श्रीसद्गुरू साईबाबामहाराज )

**र. श्री. पुजारी**

### (१९) आजारीपण हा भोग असला तरी तो खरा धन्वंतरीच

एखाद्या व्यक्तीस, वास्तूस किंवा स्थळास मोठेपणा लाभतो तोही कधी कधी जन्मजातच. जन्मगुणांमुळेच.

राजघराण्यातील व्यक्ती, रत्नांच्या खाणीतील रत्ने, निसर्गदत्त उंचीमुळे एखाद्या पहाडास लाभलेले थंड हवेचे ठिकाण म्हणून महत्व यांचे भाग्य तर केवळ असामान्य. अतुलनीयच.

विद्या, कला, व्यापार, उद्योग यांच्यामुळे मुंबापुरी कितीही झगमगत असली तरी उष्ण आणि दमट हवा तिच्या पाचवीस पुजलेली. उन्हाळा असो, पावसाळा असो-- घामाच्या धारा तिच्या अंगातून सदैव निथळत असलेल्या. हुश्य हुश्य करीत ती सदैव धापा टाकीत असलेली. अशा उष्म्याच्या वातावरणात आकाशातील पक्ष्यांनी आपला उद्योग टाकून देऊन झुपकेदार झाडांच्या थंडगार सावलीचा आश्रय करावा यात नवल ते काय!

मुंबापुरीतील अनेक धनवंतांनीही असेच केले.

उन्हाळ्यात विश्रांतीसाठी थंड हवेचे एक ठिकाण जवळच शोधून काढले. तेथे आपले बंगले बांधले. सकाळ-दुपार उंच उंच पहाडांची आणि खोल खोल दऱ्याखोऱ्यांची शोभा पाहात उन्हाळ्याचे दिवस ते या ठिकाणी मोठ्या आनंदात घालवू लागले. बायका-मुलांसह मनसोक्त गिरिविहार करू लागले.

ते ठिकाण म्हणजे लोणावळा त्याच्या परिसरातच असलेला खंडाळा.

मुंबापुरीच्या आगीसारख्या उष्ण हवेतून येऊन आगगाडी खंडाळ्याचा घाट चढू लागली की अत्यंत सुखद असा थंड हवेचा एक झोत एका क्षणात येऊन डब्यातील प्रवाश्यांना जणू प्रेमाने मिठी मारतो !

जणू सर्व वातावरण आता बदलले. सुख-शांति-विश्रांतीचे माहेर आले. या माहेरच्या वातावरणात कसलीही घाई नाही. गोंधळ नाही. रखरख नाही. सर्वत्र भरून राहिली आहे ती एक प्रगाढ शांती. कधीही भंग न पावणारी अखंड तृप्ती. विश्रांती.

सॉलिसिटर हरी सीताराम ऊर्फ काकासाहेब दीक्षित पहाड चढून असेच लोणावळ्यास आले होते. थंड हवेच्या या ठिकाणी स्वतःच्या बंगल्यात विश्रांति घेत होते. परंतु मनास विश्रांती नव्हती. मनाची अशांती येथेही पाठ सोडीत नव्हती.

काकासाहेब अहोरात्र विचार करीत होते. स्वतःशी म्हणत होते: ठणकत असलेली जखम योग्य औषधीविना कशी बरी होणार? ती अचूक औषधी हाती आल्याविना इतर भारी भारी किंमतीच्या औषधींचा उपयोग तरी काय?

हा लोणावळाच काय, पण हिमालयातील सिमला, मसूरी, नैनिताल या थंड हवेच्या ठिकाणी एखादा श्रीमंत गेला तरी त्याला तेथे खरी विश्रांती मिळणार आहे थोडीच! जखमेचा ठणका जोंपर्यंत सुरू आहे तोंपर्यंत त्या सुंदर सूर्यास्ताचा, उत्तुंग पर्वतराजींचा, मोहक चांदण्या रात्रींचा उपभोग तो रसिक घेऊ शकणार थोडाच!

गंगोत्री-जम्नोत्री, हरिद्वार-हृषीकेशपासून कन्याकुमारीपर्यंतची सर्व तीर्थक्षेत्रे; बद्रिनाथ-केदारनाथपासून चारी धाम केलेल्या तीर्थयात्रा; रुद्र-पौमानादींसह केलेल्या देवतांच्या महापूजा; व्रते-दाने-ब्राह्मणभोजने यांचे पुरे केलेले संकल्प-यापैकी एकात तरी मनाला शांति देण्याचे सामर्थ्य मला सापडेल का? मनाला क्षणभर तरी विश्रांति मिळाली का?

जीवनात एक काळ असा आला की यशाच्या पायऱ्या भराभर चढून गेलो. लक्ष्मी आणि सरस्वती दोघींचाही वरदहस्त लाभला. कीर्ति, प्रतिष्ठा, सन्मान घरी चालून आले. मुंबापुरीतच नव्हे तर विलायतेतही कीर्तीची ध्वजा फडफडत राहिली. मुंबापुरीतील एक प्रख्यात सॉलिसिटर आणि सामाजिक कार्यकर्ता म्हणून यशोदुंदुभी तेथेही वाजली.

सत्ता-संपत्ती-कीर्ति यासारखे मादक मद्य जगात दुसरे कोणते असेल?

बाटलीतील मद्याचा कैफ केवळ देहापुरताच. मनातील 'अहं'-मद्याचा कैफ सर्व जीवनाला धुंदी आणणारा. विवेकाच्या डोळ्यानाही अंध करणारा.

मी कायदेपंडित; 'कर्तुंमर्तुम्' शक्ती माझ्या ठायी; मी लाखांचा पोशिंदा; गाड्याघोडी, नोकर चाकर माझ्या हुकुमाचे ताबेदार; मी करीन ती पूर्व--हा कैफ तर उतरता उतरत नाही. जीवनाचा गेलेला तोल पुन्हा सावरता सावरत नाही.

परंतु याहीपेक्षा जहाल मद्य समाजसेवेच्या अहंकाराचे.

मी पूर्ण निःस्पृह; मी कोणाच्या एका दमडीसही न शिवणारा; धुतल्या तांदुळाप्रमाणे निर्मळ असे माझे चारित्र्य; माझ्यावर निंदेचे शितोडे जो उडवील तो केवळ नरकाचा धनी; ख्रिस्ताला खिळे ठोक करणाऱ्या पापी जनांप्रमाणे त्यांचा अंत ठरलेला. मनाला अशा किती गाठी! किती असत्य, हिडीस निंद्य गोष्टी या अशा मतलबी मनाच्या पोटी!

अशा संकल्प-विकल्पांच्या लाटांबरोबर एके काळी मीही उंच गेलो! त्यावर बसून झोके घेतले! म्हणालो: माझ्यासारख्या प्रतिष्ठितांनी सामाजिक अन्यायाच्या कामी लक्ष घातले नाही तर बहुजनांना न्याय कोण मिळवून देणार? बुडत असलेले अज्ञ जन कसे वाचणार? खरोखर हे दु:ख उघडया डोळयांनी पहावत नाही म्हणूनच मी समाजकारणाच्या या जंजाळात पडलो. अन्यथा घरी चालून येणाऱ्या संपत्तीवर लाथ मारण्याचे मला काय कारण?

प्रत्येकाच्या जीवनात काही ना काही तरी उणे ठेवण्यात त्या ईश्वराचा काय हेतू असेल बरे?

एखाद्या यंत्राची कळ केवळ त्या तंत्रज्ञालाच माहीत, यात जो उद्देश, तोच नेमका ईश्वराच्या या करणीतही असला पाहिजे.

तसे नसते तर विलायतेपर्यंत उंच चढलेला हा पतंग त्याने अकस्मात असा खेचला नसता. लंडन शहरी आगगाडीत चढताना पायास दुखापतीचे निमित्त होऊन चिंतेचा एक कायमचा विषय त्याने माझ्या पदरी बांधला नसता.

भराऱ्या घेणारे माझे मन पायाच्या या दुखण्याने तर स्वस्थानी बांधून ठेवले! अंतर्मुख होऊन विचार करण्याची सुबुद्धी मला दिली! मी खरा कोण, कोठून आलो, माझे खरे कर्तव्य कोणते याची जाण माझ्यात नव्याने निर्माण केली.

आजारीपण हा पूर्वकर्मानुसार येणारा भोग असला तरी तो खरा धन्वंतरीच. कारण तो येतो, जालीम औषध देतो, रडवितो आणि मनाचा रोग बरा करून हसत हसत निघून जातो.

पायाच्या या वेदनेने दीर्घकालीन भ्रमाच्या निद्रेतून मला जाग आणली. जीवनाविषयी खरा विचार करावयास लावले.

एक मन:शांती नसेल तर मनुष्याचे सर्व ऐहिक वैभव खोटे, तकलुपीअत एव त्याज्य हा विचार मला शिकविण्यासाठी तर या वेदनेचा अवतार ईश्वरी इच्छेने झाला नसेल!

खरोखर सर्वार्थाने धार्मिक जीवन जगत असूनही बालवयातील ती माझी मन:शांती का भंग पावली असेल बरे? ती फिरून प्राप्त होण्यास काहीच उपाय नाही का?

श्रीमत् भगवतगीतेचे नित्य पारायण, चर्चा, चिंतन मी आज किती दिवस करीत आलो! साधुसंतांची शुभ दर्शने आज किती वर्षे घेत आलो! जीवनातील जे पवित्र, मंगल, पूज्य त्याचे आलोडन आज किती तपे करीत आलो!

तरी मनाची जडता तिळभरही कमी होत नाही. ओढाळ मन एका जागी स्वस्थ बसत नाही. मनावर चढलेला कुविचारांचा गंज, कुसंगतीची पुटे कमी होत नाहीत उलट दिवसेंदिवस ती वाढतच आहेत. वृक्षावरील बांडगुळाप्रमाणे!

या बद्धतेतून आता मुक्तता तरी केव्हा होणार? कोण करणार? ती होण्याचा दिवस लवकर उगवला नाही तर मी असाच चाललो. जन्ममरणाच्या फेऱ्यांत पुन्हा अडकलो.

नरक नरक म्हणतात तो याहून काही वेगळा असेल का? धड ना अन्न ना वस्त्र. देवा! सर्व ऐहिक वैभव देऊन उतारवयात हा शाप जर मी भोगावयाचा होता तर हे वैभव तरी मला का दिलेस? ते दिले नसतेस तर दु:खाच्या इतक्या खोल दरीत तरी मी कोसळलो नसतो.

काहीही असो, हा सर्व खेळ तुझ्या अगम्य लीलेचा .तरीही मनाशी एक श्रद्धा आहे: तू अपार दयाळू आहेस. मनात आणशील तर कोणाही पाप्यास तू उध्दरू शकशील. मी तर तुझे लेकरू. माझ्याशिवाय तुला करमणार नाही. एक ना एक दिवस तू मला जवळ घेशील. म्हणशील: बाळ, मी सोवळ्यात आहे रे. तुझ्या अंगावरील हे एवढे कपडे कोणी काढील तर मी तुला जवळ घेईन.

**२० चिमणीसारखा पायाला दोरा बांधून मी त्याला ओढून आणीन.**

सकाळच्या वेळी एक टांगा शिरडीत येऊन दाखल झाला.

टांगा थांबताच त्यामधून तीन व्यक्ती खाली उतरल्या —काकासाहेब दीक्षित, नानासाहेब चांदोरकर आणि माधवराव देशपांडे शिरडीकर.

माधवरावांच्या हातात कागदाच्या वेष्टनात एक मोठी तसबीर होती. तिची काच पुन्हा फुटू नये म्हणून अहमदनगरपासून त्यानी ती आपल्या छातीशी धरून आणली होती. जणू तिला धक्का लागणे म्हणजे जीवनातील अति पवित्र अशा एका भावनेलाच धक्का लागणे होते.

ती तसबीर छातीशी धरून माधवराव शिरडीच्या रस्त्यामधून सावकाशपणे चालू लागले. नानासाहेब चांदोरकर काकासाहेबांना एका हाताने आधार देऊन त्यांच्या पायाची व्यथा न वाढेल अशा बेताने एक एक पाऊल टाकू लागले. जणू व्याधिमुक्तीसाठी बाबांच्या पवित्र चरणांशी एका बांधवाला आज ते नेत होते.

काकासाहेब मात्र पराकाष्ठेच्या भारावल्या मन:स्थितीत होते. मनाचे हे भारावलेपण क्षणाक्षणाला वाढत होते. मनाची इतकी कातर, हळुवार अवस्था यापूर्वी आयुष्यात त्यानी कधीही अनुभवली नव्हती.

मनात भरतीच्या लाटांप्रमाणे विचार उसळत होते—

कॉलेजचे ते विश्व म्हणजे एक स्वप्नच. जीवनातील भव्य, दिव्य, मंगल तेवढे विराट सागराप्रमाणे समोर होते. मनाची गलबते आपापली शुभ्र शिडे उभारून साता

समुद्रापलिकडील क्षितिजे काबीज करण्यासाठी सज्ज होती. अशक्य हा शब्द मनाच्या कोशात कोठेही नव्हता. अशा त्या चंदेरी जगात हा नारायण गोविंद चांदोरकर माझा सहाध्यायी होता. त्याची रसिकता, मनाची उदारता, संस्कृत भाषेवरील त्याचे प्रगाढ प्रेम, साहित्य–कला–इतिहास यावरील त्याचे रसिक समीक्षण यामुळे तो माझ्या अधिक आला. माझा स्नेही झाला.

पुढे ही गलबते व्यवहाराच्या वादळांमुळे एकमेकांपासून फार दूर गेली. व्यवसायाची क्षेत्रे भिन्न भिन्न झाली. पूर्वकर्मानुसार किंवा प्रारब्धानुसार कोणी प्रकाशात आले; कोणी अंधारात राहिले, तरी मनाची एक ओढ कायम होती : जुन्या मित्रानी भेटावे. कॉलेजचे ते दिवस पुन्हा नव्याने जगावेत. त्या जुन्य आठवणीत आजचा कटू व्यवहाराचा उन्हाळा क्षणभर विसरावा. काहीक्षण का होईना, कटकटींच्या या जंजाळातून सुटून त्या मित्रांच्या सहवासात निरामयतेने घालवावेत.

मी सॉलिसिटर. लोणावळ्याला माझे बंगले. लौकिकदृष्टचा अशा बडचा माणसांकडे जुना स्नेह ध्यानी घेऊन निर्हेतुकपणे कोण येणार ?

पण हा नारायण चांदोरकर आला. आपल्या मनाच्या निर्हेतुकपणामुळे माझ्या मनाच्या अगदी आतील दालनापर्यंत आला. प्रेमाच्या गुजगोष्टी त्याने केल्या. जाताना मला म्हणाला, "हरिभाऊ, पायाच्या व्यथेवर आजवर तुम्ही शेकडो उपचार केले. तसा आणखी एक उपचार तुम्हाला सुचवू का ? तो उपचार दैवी आहे. कदाचित तो तुम्हाला पसंत पडेलही."

माझ्या डोळ्यासमोर सरस्वतीगंगाधररचित श्रीगुरुचरित्रातील विदुरा नगरीतील तो यवन राजा आला. त्या राजाच्या मांडीला झालेला स्फोटककही असाच कोणत्याही औषधाने बरा होणारा नव्हता. शेवटी विदुरा नगरीतील त्या सहिष्णु यवन राजाला ब्राह्मणांनी सल्ला दिला, "एखाद्या महान सत्पुरुषाच्या सेवेने–केवळ अमृतदृष्टीनेही हा स्फोटक बरा होईल असा एक सत्पुरूष **श्रीगाणगापूर** या क्षेत्री सध्या वास करतो."

माझा अंदाज खरा ठरला. कारण त्यांच्या तोंडून शिरडी या मला अगदीच अपरिचित गावाचे नाव निघाले. तेथील साईबाबांचे नाव प्रथमच कानावर पडले. मनाशी मी म्हणालो : असतीलही असे, कोणी बाबा तेथे, आसेतुहिमालय पसरलेल्या या देवळे मठ आणि धर्मशाळानी भरलेल्या देशात किती साई–साधू–फकीर फुकरे निघतील, याला गणती नाही.

अशा बाबांविषयी त्यांच्याविषयी आलेल्या भल्याबुऱ्या अनुभवांविषयी मी काही बोलणार तोच हे चांदोरकर म्हणाले, "हरिभाऊ, इतर साधुसंत आणि माझे सद्गुरू बाबा यांच्यात एक फरक आहे. तो असा की ज्याला त्यांनी एकदा आपला मानले. ज्याच्यावर त्यांचे प्रेम जडले तो त्यांच्याकडे कधी आलेला असो किंवा नसो, त्याला ते आपल्याकडे

ओढून घेतील. चिमणीच्या पायाला दोरा बांधून तिला ओढून घ्यावे तसे ! बाबा नेहमी म्हणत असतात : माझे माणूस कितीही दूर–अगदी सातासमुद्रापलीकडे असो. चिमणी-सारखा पायाला दोर बांधून मी त्याला माझ्याकडे ओढून आणीन !"

काकासाहेबांचे डोळे एका क्षणात पाणावले.

मनाशी ते म्हणाले : खरोखर बाबांचे आणि माझे गेल्या काही जन्मांतील संबंध असले पाहिजेत. ते नसते तर चांदोरकर म्हणाले त्याप्रमाणे मी येथपर्यंत पोचलोही नसतो. कदाचित अहमदनगरचे माझे काम उरकून मी आज मुंबईत जाऊन बसलो असतो.

व्यवहारातील माणसांचे कार्यक्रम महिना महिना आधी ठरलेले. . डायरीत त्यांची नोंद त्या तारखेस केलेली. ती तारीख उजाडताच तो कार्यक्रम हाती घ्यावा लागतो तो यशस्वी व्हावा म्हणून चार आठ दिवस आधीच योजना करावी लागते.

निवडणुकीच्या झंझावाती दौऱ्याच्या निमित्ताने मी अहमदनगरास येतो काय, साईबाबांच्या लीला त्यांच्या घरी कानावर आल्यामुळे भारावतो काय आणि आज या सकाळी शिरडीत येऊन दाखल होतो काय ! सगळेच आश्चर्य !

खरोखर संत, साधु-महात्मे यांचीही आम्हांप्रमाणेच काही डायरी असेल का? तिच्यात त्या त्या व्यक्तींच्या येण्याचा, राहाण्याचा किंवा जाण्याचा काही कार्यक्रम असेल का? ते तेकार्य सुकर व्हावे म्हणून साधुसंतांच्याही काही तजविजी असतील का?

तसे नसते तर बाबांचे जणू पुत्र असे हे माधवराव देशपांडे कोणी पाठविल्याप्रमाणे नगरास का आले असते ? मिरीकरांच्या घरी येऊन मिरीकर पितापुत्रांना पडलेला पेच त्यानी चुटकीसरशी का सोडविला असता ? 'मी शिरडीसच निघालो आहे. आपणास तेथे नेण्याची व परत मुंबईच्या गाडीत बसविण्याची सर्व जबाबदारी माझी' असे ते मला का म्हणाले असते ?

परंतु त्याहून आश्चर्य म्हणजे गाडीत जागा मिळाली याचे. कारण भरून आलेल्या गाडीत जागा कोठे मिळणार ? त्यातून माझा पाय अधू. सबंध प्लॅटफॉर्मवर मी धावणार तरी कसा ? परंतु बाबानी येथेही माझी सोय पाहिली. ओळखीचा गार्ड भेटविला. त्याने अखेर मोठ्या तत्परतेने फर्स्ट क्लासमध्ये आम्हां दोघांची बसण्याची सोय केली

बाबांचे मानसपुत्र माधवराव माझ्या सोबतीस; खुद्द बाबांची तसबीर त्यांच्या छातीशी; अशा वेळी आमचा प्रवास दुसऱ्या वर्गाऐवजी पहिल्या वर्गाने का होणार नाही ? सबंध रात्र बाबांच्या प्रेमळ गुरूगोष्टीत का जाणार नाही ?

गाडी कोपरगाव स्टेशनात शिरली तेव्हा प्रसन्न मनाने मी गंगेचे दूरस्थ दर्शन घेत होतो. मनाशी म्हणत होतो : आता गाडीतून उतरताच गंगामाईचे स्नान करीन आणि शिरडीस बाबांच्या दर्शनाला जाईन. अशा वेळी लोणावळ्यास माझ्या घरी येऊन;

प्रेमभक्तीच्या गोष्टी माझ्याशी बोलून माझे पाऊल या शिरडीकडे वळविणारे माझे मित्र किंबहुना प्रेमळ गुरूबंधू नानासाहेब चांदोरकर आमच्या बरोबर असते तर किती छान झाले असते ! परंतु ते पडले सरकारी नोकर. नित्य फिरतीवर असलेले अधिकारी.

मनात असा विचार येऊन गाडी स्टेशनात थांबल्यानंतर मी प्लॅटफॉर्मवर उतरतो तोच स्वत: नानासाहेब चांदोरकरच माझ्या पुढ्यातच उभे !

जीवन हा एक योगायोग आहे असे म्हटले तर इतके सुयोग परावलंबी असलेल्या माझ्या बाबतीत कोणी घडवून आणले ? या आडगावी येण्यासाठी सर्वोत्कृष्ट सोबत रात्रभर गुरुलीलांचा सत्संग, गुरुबंधू नानांची आकस्मिक भेट; गंगेचे पापनाशी स्नान; आणि आताची गुरूमंदिराकडे चाललेली ही पावले—खरोखर आज धन्य झालो ! कृतार्थ झालो ! आयुष्याच्या इतक्या आडवाटा चालल्यानंतर आज खरी वाट सापडली ! माझ्या सद्‌गुरूंच्या घराची वाट एवढ्या यातनांनंतर आज मला मिळाली !

अहमदनगरात असताना सद्‌गुरूंच्या भेटीचा जो शोष मनास पडला, जी काहिली झाली, ती माझ्या एकांतीची तगमग सद्‌गुरूंना कळली असेल का ? म्हणूनच त्यांनी तसबीररूपाने माझा सांगाती होऊन, माझा हात धरून बेताने मला येथे आणले असेल का ?

सद्‌गुरो ! आता मला काही नको. एक तुमची चरणयुगुले मला दाखवा. त्यांच्या सावलीत हे आजवरचे अस्थिर, अशांत मन आता विसावू द्या.

प्रवासातील आपले सामानसुमान, बरोबर असलेल्या मनुष्याकडून साठे यांच्या वाड्यात नीट लावून घेतल्यानंतर नानासाहेब चांदोरकर काकासाहेब दीक्षिताना घेऊन मशिदीत बाबांच्या दर्शनासाठी गेले.

माधवराव आणि नानासाहेब यानी बाबांच्या चरणी मस्तक ठेवून बाजूस झाल्या-नंतर काकासाहेबांनी मशिदीच्या त्या धुळीत बाबांना साष्टांग नमस्कार घातला. बाबांचे चरण मोठ्या प्रेमाने पुन:पुन्हा आपल्या मस्तकाशी घट्ट घट्ट धरले, भावना अनावर होऊन डोळे प्रेमाश्रूंनी वाहू लागले. सर्व देह आनंदाने पुलकित झाला. गहिवरलेल्या कंठाने पुन: पुन्हा म्हणू लागले, "खरोखर आज धन्य झालो ! कृतार्थ झालो ! मनाचे लंगडेपण जाऊन आज खरा सुंदर झालो !"

दीक्षितांचा भावनावेग ओसरल्यानंतर दीक्षितांकडे पाहून बाबा मोठ्या प्रेमळपणे हसले. 'सद्‌गुरूंनीच आज मला आपल्या पायाशी आणले हा त्यांच्या मनाचा अभिप्राय पुरा करण्यासाठी जणू बाबा म्हणाले, "तुझी वाट पाहिली पाहिली आणि विचार केला : आता या शाम्यासच थेट नगरास पाठवावा."

**२१. तापलेल्या, गडगडणाऱ्या मेघांच्या पोटी असलेल्या अमृतधाराप्रमाणेच साधु-संतांचे प्रेम.**

कासवीची लहान लहान पिले नदीच्या एका तीरावर; तर त्यांची आई कासवी दुसऱ्या तीरावर.

पण दोन तीरांमधील अंतरामुळे प्रेमात दुरावा नाही. खंड नाही. उलट डोळ्यांवाट बत्तीस धारांची वाहाणारी वात्सल्याची कास प्रत्येक क्षणी त्या प्रेमामृताने तुडुंब भरलेली बाळपोषणासाठी रिती होण्यासाठी उत्सुक असलेली.

जे स्वयंभूपणे परिपूर्ण, त्या पूर्णातून पूर्ण काढून घेतले तरी शेष पूर्णच राहाणार, असे हे परब्रह्म. सद्‌गुरूरुपी परब्रह्म. !

शिरडीसारख्या एका नगण्य खेड्यातील पडक्या मशिदीतील धुळीत नित्यमुक्त बाबांचा वास; तर वांद्र्याच्या या वैभवशाली प्रासादात माझ्यासारख्या सर्वार्थाने बद्ध, पंगू व्यक्तीचा निवास.

पण या दोन तीरांमधील अंतर माझ्या अकल्पित भाग्ययोगामुळे गेल्या दोन महिन्यात घटले. कासवीची अमृतवर्षिणी प्रेमदृष्टी या पिलावर पडली. भुकेल्या आत्म्याचे पोषण न कळत झाले. जणू येथे परत आलो तो आईच्या प्रेमाचे दूधतूप पिऊन, गुटगुटीत होऊन.

धनामुळे माणसाचा अहंकार उग्र होतो. यत्किंचितही मानहानी खपत नाही. पण बाबासमोर गेलो आणि अहंकार वितळला बाबांसारख्या एका य:कथित फकिराचे एकेरी संबोधणेही मला खपले नाही. उलट मोठ्या वात्सल्याने त्यानी माझे जे नवीन नामकरण केले तेही मला प्रियच झाले. काकासाहेब म्हणण्याऐवजी बाबा मला 'बंब्या' म्हणाले. 'लंगडा' काका म्हणाले.

लोकांच्या दृष्टीने मी काका. धनामुळे 'काकासाहेब' झालो. तरी बाबांपुढे मी ाडके लेकरू बंब्याच ! काका झालो तरी लंगडाच !

'अरे बंब्या !' अशी मायेने भरलेली मनमोकळी हाक बाबानी ज्या क्षणी मारली त्या क्षणी माझ्या सर्वांगातून आनंदाची एक लकेर विजेप्रमाणे निघून गेली. मनात विचार आला : वात्सल्याची जी मूर्ती तिला राग-द्वेषादी भावना कधी तरी असतील का? साखरेची बाहुली पाण्यात पडली म्हणून तिचे कधी मीठ झाले आहे का ?

सिदिक फाळक्यावरील रागामुळे बाबांनी मशिदीतील मातीच्या घागरींचा आणि कोळंब्याचा चक्काचूर केला या म्हणण्यात काय अर्थ आहे ? चक्काचूर केला तो त्या घागरींचा नव्हे. दुसऱ्याच कोणत्या गोष्टींचा. अनेक जन्म घालवूनही त्या वृद्ध हाजीला ज्याचा चक्काचूर करता आला नसता, तो बाबानी एका क्षणात करून टाकला. मसणातील फुटक्या, गळक्या मडक्याप्रमाणे.

सच्चिदानंद श्रीहरीने केलेला पूर्वकर्मांचा हा चेंदामेंदाच होय.

तो करीत असताना दयाळू प्रभूनी नरसिंहावतार धारण केला तर वाईट वाटून घेण्यासारखे काय आहे ? उलट प्राणावर बेतलेले मारावर निभावले हाच विचार येथे दूरदर्शीपणाचा.

संतांची कृती, त्यांचा शब्द, त्यांची विक्षिप्त वागणूक याचा अर्थ लागणेही जेथे कठीण; तेथे त्यांच्याविषयी काही मत बनविणे तर अगदीच आतताईपणाचे. अपक्व बुद्धीचे लक्षण.

माधवरावांच्या बोटाला साप चावला तेव्हा गावकरी मंडळी त्याना बिरोबाच्या म्हणजे शंकराच्या देवळाकडे घेऊन निघाली. परम गुरुभक्त माधवरावांनी त्याला विरोध केला. मशिदीकडे ते धावत आले. हेतू हा की मशिदमाईची पायरी आपण एकदा चढलो की सापाचे विष वर चढणार नाही.

पण झाले उलटेच.

माधवरावाना पाहाताच बाबा करुणार्द्र होण्याऐवजी अत्यंत क्रोधाविष्ट झाले. घाईघाईने मशिदीची पायरी चढणाऱ्या माधवरावांवर संतप्त होऊन ओरडले, "चल नीघ ! हो खाली ! खबरदार वर चढशील तर भटुरड्या !"

बाबांचा क्रोध, शिव्या, मारहाण—सर्व माधवरावांनी आजवर नुसते डोळ्यांनी पाहिलेले. त्यातीलच काही निदान अशा प्रसंगी आपल्या वाटचास येईल असे त्यांना स्वप्नातही वाटले नाही. साहजिकच आपल्या संकटप्रसंगीचे बाबांचे हे कटु वर्तन पाहून त्यांना अत्यंत दु:ख झाले. साप चावून आपला अंत तात्काळ, जागीच का झाला नाही असे त्यांना वाटले. निराश होऊन तेथेच त्यानी बसकण घेतली. मनात म्हणाले : देवाचाच जेथे कोप झाला तेथे कोणाचे काय चालणार ? या सर्पदंशातून मी आता काही उठत नाही. काही क्षणांचाच मी आता सोबती...

माधवराव सच्चे गुरुभक्त. मरण आले तरी ते सद्‌गुरूंच्या पायी ही मनोमन इच्छा काही झाले तरी आता आपण जगणार नाही ही मनाची भावना. म्हणून धीर करून बाबा थोडे शांत झालेसे पाहून मशिदीच्या पायऱ्या चढून वर आले. बाबांच्या पायाशी बसून राहिले. तेव्हां कनवाळू बाबा त्याना म्हणाले, "तुला काहीही होणार नाही जा. तू खुशाल घरी जा.

"अरे, त्या फकिराला काय तुझी काळजी नाही ? मग तू का काळजी करतोस ? मी सांगतो त्यावर विश्वास ठेव आणि घरात जाऊन स्वस्थ बैस. बाहेर मात्र कोठे हिंडू फिरू नकोस म्हणजे झाले."

मशिदीच्या पायऱ्या उतरून माधवराव जेमतेम घरापर्यंत पोचले असतील नसतील. तो लगेच तात्याबा कोत्याला माधवरावांच्या समाचारास धाडला. म्हणाले, "त्याला

सांग, म्हणावे की घरातल्या घरात तू वाटेल तितका हिंड-फिर; मनास येईल ते खा-पी; पण डुलकी तेवढी सांभाळ. ती आली की म्हणावे घरातल्या घरात नुसता चालत रहा. पण निजू मात्र अजिबात नकोस."

आम्ही सर्वच जण माधवरावांच्या काळजीने ग्रासलेले. आता काय होणार या धास्तीने हाय खाल्लेले. संध्याकाळच्या सुमारास मला जवळ बोलावून मोठ्या विश्वासाने एखाद्यावर जबाबदारी सोपवावी तशा सुरात बाबा म्हणाले, "रात्र झाली म्हणजे एखादेवेळी त्याला डुलकीबिलकी येईल. तर तुमचेही त्याच्यावर थोडे लक्ष असू द्या."

बाबांचे ज्यांच्यावर पूर्ण लक्ष, बाबांचे जे जीव की प्राण, त्या माधवरावांवर मी लक्ष काय ठेवणार ! तरी पण देहाने तेथे जाऊन बसलो. पाण्याचे शिडकावे मारून सबंध रात्रभर त्यांना जागे ठेवले. एकही डुलकी त्यांना घेऊ दिली नाही. तेव्हा कुठे आम्ही सुटलो.

आणि त्याच क्षणी माधवरावांचा अपमृत्यू टळला.

माधवराव पूर्ण बरे झाले. मशिदीत पुन्हा येऊ लागले.

नंतर काही दिवसानी ध्यानी आले : 'खबरदार वर चढशील तर भटुरड्या' हे शब्द त्या सर्पविषाला उद्देशून होते ! जी शिवी गाळ होती तीही त्या सर्पविषाला उद्देशून होती. मनाचा जो क्षोभ होता तोही अनिर्बंध, साक्षात मृत्यू अशा त्या सर्पविषाला उद्देशून होता.

आईला पूज्य लेकराच्या कल्याणाची चिंता रात्रंदिवस तेच लेकरू तिच्या मनःक्षोभाचे नित्य कारण होते. त्या लेकराला यत्किंचितही कोठे इजा झाली की तिच्या मनाचा क्षोभ अनावर होतो. त्या क्षोभापोटीच ती त्याला क्रूरपणे मारते झोडते. कडु शब्दानी त्याला यथेच्छ ताडन करते.

गटारातील घाणीत दिवसभर डुंबणारी सामान्य अशी गावडुकरी पण तिचे दुखावलेले वात्सल्यही कधी कधी मूर्तिमंत क्रौर्य होऊन गावभर धुमाकूळ घालते. साधुसंतांना तर आपल्या असंख्य लेकरांची चिंता. लेकरांचे दुःख पाहून त्यांच्या वत्सल मनाचा क्षोभ अनावर झाला नाही तरच आश्चर्य ! तापलेल्या, गडगडणाऱ्या मेघांच्या पोटी असलेल्या अमृतधारांप्रमाणेच साधुसंतांचे हे मुलखावेगळे प्रेम.

अंतर्यामी हे जाणूनच की काय माझ्यासारखी दुःखी-कष्टी माणसे शिरडीस येतात. बाबा त्यांना ओढून नेतात. त्याना घासून-पुसून, स्वच्छ करून त्या त्या गावी त्यांची पाठवणी करतात. जणू म्हणतात : तुझे आजारीपण गेले. स्वतःच्या हाताने तू आता

दोन घास खाऊ लागलास. स्वतःच्या पायानी चार पावले तू आता चालू लागलास, आता मला तुझी चिंता नाही. जसा बाळ. देवाचे नाव घेऊन आपले कर्तव्य करून सुखात रहा.

परंतु बाबांचे पाय सोडून शिरडीतून जाता जाववत नाही. सासरी चाललेल्या कन्येप्रमाणे डोळे पुनःपुन्हा भरून येतात. पाऊल काही केल्या उचलत नाही. मागे वळून शिरडीकडे पाहिल्याविना राहवत नाही.

बाळाजी पाटील नेवासकर प्रपंचतापाने पोळले. प्रपंचबंधने तटातट तोडून या माहेरी आले. त्यांच्या मनाची समजूत घालून त्याना परत गावी नेण्यासाठी मोठमोठे येथे येऊन थकले, पण उपयोग झाला नाही. प्रपंच-मोहामुळे पाटलांचे विरक्त मन यत्किंचितही विरघळले नाही.

बाबाचे जाण्यायेण्याचे रस्ते पाटलांनी रोज दोनदां झाडावेत. रस्त्यावरील सर्व घाण हाताने निपटून काढावी. पाणी मारावे. मशीद झाडावी. दाट शेणकाल्याने सारवून घ्यावी.

बाबांचे दर्शन नित्य नेमाने घ्यावे. पण तेही दुरूनच. आपला पायाचा स्पर्शही बाबांना नको या भावनेने. आपल्या पापांमुळे बाबांना दुःखे भोगावी लागतील या हळव्या जाणीवेमुळे.

पाणी प्यावयाचे तेही बाबांचे चरणतीर्थ. उष्टे पाणी. स्नानाच्या वेळी बाबांच्या अंगावरून ओघळलेले मोरीचे पाणी. त्याविना पाण्याचा थेंबही तोंडात घालणे नाही.
जे काही आपले ते सर्व बाबांचे. ते आधी बाबांना अर्पण करावयाचे. बाबा देतील तेवढ्यातच आपली गुजराण करावयाची. त्याहून अन्य काहीही घ्यावयाचे नाही.

शेतीचे उत्पन्न येई. गावाकडील मंडळी धान्य धुन्य—सर्व काही आणून मालक म्हणून त्यांच्या स्वाधीन करीत. ते यानी घ्यावयाचे. बाबांच्या चरणी मशिदीत अर्पण करावयाचे, "बाबा, हे घ्या तुमचे शेतीचे उत्पन्न."

अशी दोन वर्षे त्या पाटलाने शिरडीत काढली. कासवीच्या दृष्टीने बाबानी त्यांच्याकडे पाहिले. एक दिवस बाबा म्हणाले, "तू आता तुझ्या गावी जाऊन तुझ्या बायका मुलांत रहा. मनास वाटेल तेव्हा मधून मधून येत जा. जा बाळ !"

अशी किती माणसे ! किती पुरुष, किती स्त्रिया !

सर्व जातीची, सर्व वयाची, सामाजिक दृष्टया सर्व दर्जाची अशी माणसे येणाऱ्या या महातीर्थावर आज येत आहेत. दूर दूरहून येणाऱ्या लहानथोर नद्यांप्रमाणे या साग-

राच्या पोटी विलीन होत आहेत. जणू जे येणे घडेले ते परत जाण्यासाठी नव्हे. विलीन होण्यासाठी. ह्या विराट तीर्थाशी एकरूप होण्यासाठी.

काकासाहेब दीक्षिताना शिरडीच्या दोनतीन वाऱ्यानंतर वाटू लागले : आपले स्वतंत्र अस्तित्व आतां संपुष्टात आले. आपण स्वतःचे उरलो नाही. संकल्प करणेही जेथे हाती उरले नाही तेथे सिद्धी तरी आपल्या हातची कोठली ?

वृत्तीतील हा बदल कोणाकडेही बोलण्यासारखा नव्हता. यामुळे काकासाहेबांनी या गोष्टीबद्दल व्यवहारात पूर्ण मौन पाळले. मात्र आनंद येथील आपले निकटचे स्नेही रेसिडेंट मॅजिस्ट्रेट श्री. अण्णासाहेब दाभोळकर याना एक सविस्तर पत्र लिहिले. त्या पत्रात मात्र मनातील आनंद मनमोकळेपणे व्यक्त केला होता.

## –: श्रीसाईभक्ताचे साई सेवकांना सहाय्य :–

**श्रीसाईबाबांच्या ज्या भक्तमंडळीकडे दूरचित्रवाणी संच असेल व त्या बाबतीत त्यांना कोणत्याही प्रकारचे सहाय्य किंवा सल्ला हवा असेल तसेच जी साईभक्त मंडळी 'इलेक्ट्रॉनिक्स' या उद्योग व्यवसायातील असतील किंवा पडू इच्छित असतील त्यांना जर कोणत्याही प्रकारचे मार्गदर्शन हवे असेल तर ते विनामूल्य दिले जाईल.**
**भेटा किंवा संपर्क साधा– श्री. प्रकाशभाई दोशी, डी. इ. आय. टीव्ही आय. इ. (यु.एस.ए.) इ. ९, कल्पना को ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी, आंग्रेवाडी, टिळकनगर, गिरगाव मुंबई ४ किंवा श्री. दोशी, टेलीराड, चांदिवली, साकी विहार रोड, मुंबई ७२ दूरध्वनि ५८३६०१,५**

–संपादक

# श्री गोंदवलेकर महाराज

(व्यक्ति दर्शन)

पु. मु. अत्रे

**पिशाच्याशी संवाद**

भूत-पिशाच्चांची बाधा असलेले पुष्कळ स्त्री-पुरुष गोंदवल्यास श्रीमहाराजांकडे येत. बाधा झालेल्या माणसाला त्यांच्यापुढे आणले आणि त्यांची दृष्टादृष्ट झाली की कधी न बोलणारे ते भूत आपल्या वासना श्रीमहाराजांना त्या माणसाच्या तोंडून बोलून दाखवी आणि श्रीमहाराजही त्याच्याशी अत्यंत आपुलकीने गोड बोलून त्याच्या वासनांची तडजोड करीत. हट्टीपणाने त्याला ते पटले नाही तर प्रसंगी त्याला धाक दपटशा करीत व क्वचित् मारीतही. मग ते भूत ताळ्यावर येऊन त्यांचे म्हणणे कबूल करून व मुक्तीची प्रार्थना करून मुक्त होत असे व त्या माणसाचा जन्माचा छळ मिटत असे.

महाराज सांगत, "तीर्थक् योनि आपल्या वासना तृप्त करण्यासाठी मनुष्याचा आश्रय घेतात. ज्याची आत्मशक्ति अत्यंत दुबळी झालेली असते अशा माणसाचे मन दरवाजे सताड उघडे टाकलेल्या घराप्रमाणे असते. अशा मनाच्या घरांत भूतादिकांना बिन-विरोध सहज प्रवेश करता येतो. मग त्या योनि आपल्या वासना उपभोगू लागतात. त्यांच्या वासना तमोगुणांच्या असल्यामुळे त्या माणसाच्या सामान्य जीवनाची खळबळ करून त्याची दशा करतात व समाजाहून विलक्षण अशी त्याची वागणूक होते. सत्पुरुष त्याच्या मनांत आपल्या ऊर्जस्वल सत्वगुणांच्या आत्मशक्तीचे क्षेपण करून त्याचे दुबळे मन सतेज करतात आणि मग त्या भूतादिकांचा धिंगाणा कांही एक चालत नाही. एक तर ते त्या माणसाला सोडतात किंवा मुक्तता करून घेतात. गायत्री मंत्राला मात्र भूते भयंकर भितात."

**अजपाजपाचा प्रत्यय दिला :**

एकदा श्रीमहाराजांनी ओढ्यावर आंघोळ केल्यावर काशीताई तेथे होत्या त्यांना विचारले, "नाम कसे घ्यावे सांगा पाहू ?" त्या म्हणाल्या, "माळेवर किंवा वेळ मिळेल त्यावेळी नाम मी घेते एवढे मला माहीत आहे." यावर ते म्हणाले, "जरा माझ्या डाव्या बाजूला छातीला कान लावा." काशीताईंनी कान लावल्यावर त्यांना 'श्रीराम जय राम जय जय राम' स्पष्ट ऐकू आले. श्रीमहाराज म्हणाले, "नाम इतके खोल गेले पाहिजे. नाम सतत घेतले की असे खोल जाते."

श्री. न. चि. केळकरांचे वडील बंधु महादेव चिंतामण यांना महाराजांनी आपल्या टाळूला, छातीला, मनगटाला वगैरे कान लावण्यास सांगितले. तेव्हा त्यांना त्रयोदशाक्षरी

मंत्र स्पष्टपणे ऐकावयास आला. याचा केळकरांचे मनावर इतका परिणाम झाला की, त्यांनी श्रीमहाराजांना साष्टांग नमस्कार घालून तेथेच अनुग्रह घेतला. हा प्रत्यय कोणालाही केव्हाही येत असे.

एकदा शिव दीक्षितांनी विचारले, "महाराज हा ध्वनि सर्व शरीरात एकसारखा असतो काय!" ते म्हणाले, "होय. अजपाजप तो हाच. सतत नामाच्या अभ्यासाने तो कोणालाही साध्य होतो व जीव शुद्धीत असे तोपर्यंत नाम घेता येते. नामांत चित्त गुंतले की त्या माणसाला स्वतःचा विसर पडतो व त्याचे सर्व व्यवहार सहजगत्या होऊ लागतात आणि त्याला भगवंताचे दर्शन होते. मग तो जगातील कोणतेही ऐश्वर्य कस्पटासमान मानतो. यासाठी तर मी हा नामाचा बाजार मांडला आहे. अरे कोणी तरी हे व्यसन लावून घ्यारे. मग राम तुमची पाठ सोडणार नाही बघा!"

**केवळ देहदंडाने भगवंत मिळत नाही:**

कऱ्हाडला एका तरुणाने श्रीमहाराजांनी आपल्या घरी येऊन दर्शन द्यावे म्हणून उपोषण सुरू केले. महाराजांनी त्याला निरोप पाठविला की, "मी त्या बाजूला आलो म्हणजे आपणहून तुमच्याकडे येईन. तुम्ही याकरिता उपोषणाचा आततायीपणा सोडा." तरी त्या तरुणाने उपोषण चालू ठेवले. शेवटी त्याचे आई-वडील गोंदवल्यास येऊन त्यांनी काकुळतीने डोळ्यांतून पाणी गाळीत श्रीमहाराजांना विनविले की, "निदान आमच्याकरिता तरी आपण आमच्या घरी यावे व मुलाला दर्शन द्यावे." त्या वृद्धांच्या मनाची अवस्था जाणून श्रीमहाराज त्या तरुणाकडे गेले. श्रीमहाराज त्याला म्हणाले, "माझ्यासारख्या एका माणसाच्या भेटीची गोष्ट सोडा. माणसाची भेट केवळ देहदंडाने कदाचित होईल. पण इष्टतम जो भगवंत त्याची भेट केवळ देहाला दंड करून होणे शक्य नाही. त्याच्या भेटीच्या तळमळीने जर त्याला उपोषणे घडत राहिली तरच कळवळ्याने तो येईल. पण भेटीचा एक मार्ग म्हणून उपोषण हाताशी धरले तर भगवंत कधींही येणार नाही. म्हणून उपोषण 'करून' काही मिळत नाही ते 'घडावे' लागते."

**चितुबुवाच्या मूळव्याधीला औषध:**

साताऱ्याच्या चितुबुवाला मूळव्याध होती. किती औषध घेतले तरी गुण मुळीच येईना. शेवटी जिवाला वैतागून त्यानें डोंगर पाहिला. बायकोने सांगितलें कीं, तुम्ही संतांना शरण जा. दयाळू संत तुम्हाला निश्चित यातून सोडवतील "म्हणून तो पलुसच्या धोंडिबा महाराजांकडे गेला. त्यांनी त्याला पाहताच म्हटलें, "अरे, तू इकडे कशाला आलास? आम्ही अशी उपाधि घेत नाही. गणूबुवांनी गोंदवल्यास रामाच्या नांवाचा बाजार उघडला आहे. बाजारांतला माल अगदी चोख आणि स्स्ताईची तर

कमाल आहे. त्याच्या सांगण्याप्रमाणे इलाज कर की खात्रीने बरा होशील." चितुबुवा गोंदवल्यास आला. श्रीमहाराज माहीत असल्यासारखें बोलले, "बरे झाले तुम्ही इथे आलात ते! राम बरे करील." श्रीमहाराजांनी त्याची धर्मशाळेत राहण्याची सोय केली. चितुबुवा मंदिरात जेवी राळयाचा भात, जाड बाजरीची भाकरी आणि तिखट जाळ आमटी. रामाचे तीर्थअंगारा व तोंडाने रामनाम हेच त्याचे औषध! श्रीमहाराजांनी विचारले, "चितुबुवा, मूळव्याध बरी झाली तर रामनाम टाकणार नाही ना?" तो हात जोडून म्हणाला, "नाही महाराज .जन्मभर मी नामस्मरण करीन." दहा-बारा दिवसत ठणका व सूज ओसरून त्याची व्याधि आटोक्यात आली व श्रीमहाराजांच्या अनुज्ञेनें तो घरी गेल्यावर पंधरवड्याने पूर्ण बरा झाला. पुन्हां आयुष्यात त्याला त्रास झाला नाही.

**मनुष्याने प्रपंच कसा करावा?:**

श्रीमहाराज वारंवार सांगत की, "मनुष्याने प्रपंच करावा. पण तो परमार्थाकरिता केला तरच प्रपंचाचे कष्ट फुलासारखे हलके होतात व कृतकृत्यतेचा सुगंध पसरवितात. प्रपंचात परमार्थ मिळविण्याचे साधन नामाशिवाय दुसरे नाहीं." त्यांनी हे स्वत: अनुभवून नंतर लोकांना सांगितले. त्याचे बीज खोलवर रुजलेले पाहून 'रामरायाने माझी इच्छा पूर्ण केली असे परमसमाधानाने ते म्हणत.

**मला ब्रह्म दाखवा:**

एक मनुष्य श्रीमहाराजांचे दर्शन घेऊन ब्रह्म दाखविण्यासाठी सारखा मागे लागला. श्रीमहाराज त्याचा हेतु ऐकून म्हणाले, "रामाची इच्छा असेल तर ब्रह्माचे दर्शन घडविण्याचा मी प्रयत्न करीन. तुम्ही आतांच आला आहात, जरा विश्रांति घ्या, मग उद्या आपण त्याचा विचार करू." दुसऱ्या दिवशी सकाळी ते प्रवचनात म्हणाले की परमार्थासाठी (१) नित्यानित्य विवेक, (२) वासनाक्षय, (३) समभाव आणि (४) तितिक्षा हे गुण साकल्याने साधकाच्या अंगी पाहिजेत. दुपारी त्या गृहस्थाने श्रीमहाराजांना सांगितले की, आपल्या सकाळच्या प्रवचनांत सांगितलेली सर्व साधने माझ्यांत मूर्तिमंत आहेत. सर्वांत कठिण असा जो वासना क्षय तो मी केव्हांच मिळविलेला आहे. मी अगदी खरे सांगतो की, मला नारी-नरांत भेदच दिसत नाही. श्रीमहाराज म्हणाले, "अरे वा! मला कल्पना नव्हती अं! तुम्ही पुष्कळ आघाडी मारली आहे तर! मग उद्यां सकाळी मी निश्चित तुम्हाला ब्रह्म दाखवितो." त्याला फार आनंद झाला. दुसऱ्या दिवशी स्नान करून तो येत होता. श्रीमहाराजांनी पटाईत मावशीला बोलावून म्हटले, "ए मावशी, तो माणूस येत आहे ना, त्याला स्त्री-पुरुष भेद माहीत नाही. जा, आणि त्याचे धोतर ओढ.' ती गेली आणि खसकन् त्याचे धोतर तिने ओढले. त्याच्या तळपायांची आग मस्तकांत

शिरली! धोतर सावरीत व आरडाओरड करीत तो तडक श्रीमहाराजांच्याकडे गेला आणि म्हणाला, "त्या थेरडीने चक्क माझे धोतर ओढले! ती कोण वेसवा आहे की कोण आहे?" श्रीमहाराज खदखदून हसले व म्हणाले, "अहो, म्हणजे ती व्यक्ति भिन्नलिंगी आहे असे ठाम तुम्हाला वाटले ना? शिवाय वस्त्र फिटल्याची लाज वाटून रागही आला! मग तुम्हीच सांगा, साधनचतुष्टयांतले एकतरी साधन तुमच्यांत मुरले आहे काय? मग मी ब्रह्म दाखवू लागलो तर ते तुम्हाला दिसेल कसे?" त्याने श्रीमहाराजांचे बिनतोड भाषण खालच्या मानेने ऐकले. तेव्हा त्यांनी त्याला अनुग्रह देऊन घरी पाठवलें.

**महाराज, तुम्ही नुसते 'पाणी लागेल' असे म्हणा :**

एका सकाळी श्रीमहाराज धर्मशाळेकडे गेले. तो तिथे पांचसहा तरणे बांड गप्पा झोकीत असलेले त्यांनी पाहिले. तरुण मुलांना ते म्हणाले, "अरे, तुम्ही तरुण असा आळसांत का वेळ घालवता? काहीतरी काम करा! चला, आपण धर्मशाळेजवळ विहीर खोदू." सामान घेऊन श्रीमहाराज त्यांच्याबरोबर गेले. मुलानी मुहूर्ताची कुदळ श्रीमहाराजांना मारण्यास विनंती केली व मग स्वत: खोदण्यास सुरवात केली. चार दिवस काम झाल्यावर एक तरुण म्हणाला, "महाराज, तुम्ही नुसते 'पाणी लागेल' असे म्हणा कीं खात्रीने झरा फुटेल. श्रीमहाराज म्हणाले, "अरे, नुसते एकदाच 'जानकीजीवनस्मरण जय जय राम' असे तळमळीने म्हणा की पाणी लागेल." त्याने तसे म्हणून एकच कुदळ मारली तो पाण्याचा स्रोत वर उसळला. सर्वांना आनंद झाला. श्रीमहाराज म्हणाले, "भगवंताच्या नामांत फार सामर्थ्य आहे. त्याचे नाम व्यवहारात नेहमीच यश देईल असे नाही पण त्याची लाज भगवंत राखतील हे निश्चित. प्रपंचात यशापयश तात्पुरते असते, पण भगवंताचे अनुसंधान खरे महत्त्वाचे आहे."

**प्रपंच हा असा आहे :**

पंढरपुरच्या एका बाईचा लहान मुलगा यकृताच्या विकाराने आजारी होता. डॉक्टर-वैद्यांनी हात टेकल्यावर त्या बाई मुलाला घेऊन गोंदवल्यास आल्या. एके दिवशी दुखणे विकोपास जाऊन सायंकाळी पांच वाजता मुलगा गेला. महाराज मुलाला मांडीवर घेऊन फार शोक करू लागले व बाईचे सांत्वन करून मंदिरातून बोलावणे आले म्हणून ते गेले. तिथे गोरज मुहूर्तावर एक लग्न होते. महाराज त्या लग्नांत इतके दंग झाले की, "क्षणापूर्वी मुलाच्या मृत्यूबद्दल शोक करणारे महाराज हेच की दुसरे?" असा विस्मय हरिपंतांना वाटला. रात्री श्रीमहाराज आपणहून हरिपंतांना म्हणाले, "पाहिलेत ना मास्तर! प्रपंच हा असा आहे. आता सुख तर जराशाने दु:ख. पण प्रपंच भगवंताची लीला आहे अशा निष्ठेचे आपले मन झाले की सुख आणि दु:ख ही दोन्हीही त्याचीच. आपण त्याच्या नामात चित्त गुंतवून सुखदु:खात जरी सामील झालो तरी आपल्याला वेगळे रहाता येतें."

**कार्यकारणभावाचा गूढपणा :**

सांगलीला एकदा मारामारी झाली. त्यात एका भाविक बाईचा एकुलता एक तरुण मुलगा पकडला गेला. मुलगा संशयाने पकडला होता तरी त्या बाई फारच घाबरल्या व त्यांनी श्रीमहाराजांच्या पादुका पाण्यात बुडवून सांकडे घातले. तीन दिवस पाण्यात पादुका राहिल्या. मुलगा दोषमुक्त होऊन सुटल्यावर त्याच्या आईने पादुकावर दुधाचा अभिषेक करवला, अपराधाची क्षमायाचना केली व दांपत्य भोजन घातले. इकडे गोंदवल्यास, पाण्यांत पादुका बुडल्याच्या दिवसापासून, श्रीमहाराजांच्या पायावर एकाएकी सूज दिसू लागली. त्याच दिवशी डॉ. सर भालचंद्र भाटवडेकर त्यांच्या दर्शनास आलेले होते. तेव्हा, महाराज ते नको नको म्हणत असताही, डॉक्टर साहेबांनी त्यांना गोळ्या व मलमे दिली. निरोप देतांना श्रीमहाराजांनी डॉक्टर साहेबांना बरे वाटावे म्हणून म्हटले, "आपण दिलेली औषधे मी घेईन आणि पथ्यही पाळीन." पण डॉक्टर साहेब गेल्यानंतर श्रीमहाराजांनीं सांगितले, "हरिपंत, ती औषधें फेकून द्या. नुसत्या औषधाने जर रोग बरे होत असते तर त्यांच्या दोन बायका कशाला मेल्या असत्या? रोगाच्या बाह्य लक्षणावरून रोगाचे खरे निदान होत नाही. जगांतील घटनांचा कार्यकारण भाव फार गूढ असतो, कारण जडाचा सूक्ष्माशी संबंध असतो. नुसत्या जडाचा विचार करून भागत नाही. म्हणून आपले भिषगाचार्य, रोग्याला सूक्ष्मांतून निर्माण झालेला दोष जाण्यासाठी औषधाबरोबर दैवी उपासनाही सांगत असत." श्रीमहाराजांच्या पायांची सूज आपोआप गेली. दीड महिन्याने त्या बाईनी येऊन स्वत: आपली हकीकत सांगितली तेव्हा महाराजांच्या पायाच्या सुजेचा संबंध कळला.

# नित्य मी जिवंत, जाणा हेंचि सत्य....

लेखक: श्री. चंद्रकांत दामोदर सामंत

वरळीच्या जांबोरी मैदानानजीक असलेल्या श्रीसाई मंदिराविषयी व विशेषतः तेथील साईभक्त श्री. मोहितेबाबा ह्यांच्या कार्याविषयी माहिती देणारा एक लेख "साईलीला" च्या मार्च १९७३ च्या अंकात प्रसिद्ध झाला होता. मोहितेबाबांच्या जीवनात श्रीसाईबाबांबद्दल वेळोवेळीं आलेले उत्कट अनुभव "साईलीला" च्या वाचकांना भक्तिमार्गातील लोकांना बोधप्रद व निश्चित मार्गदर्शक होतील म्हणून खाली देत आहे.

## साईभक्तीची प्रेरणा:

साधारणपणे १९५० च्या पूर्वी मोहितेबाबा श्रीहनुमानाची उपासना करीत असत. मुंबईच्या डिलाईल रोड भागातील एका हनुमान मंदिरात मोहितेबाबा रात्री बाराच्या सुमारास नेमाने पूजेला जात असत. एके दिवशी त्यांना हनुमानाचा एक साक्षात्कार झाला लगेच शिर्डीला जाण्याची सूचना मिळाली. त्याप्रमाणे ते जेव्हा पहिल्यांदाच शिरडीला गेले तेव्हा त्यांनी स्नान वगैरे आटोपून सर्वप्रथम गुरुस्थानाचे दर्शन घेतले व तेथेच ते ध्यानास बसले. ध्यानमग्न असताना काही वेळाने त्यांना जाणीव झाली की कोणीतरी एक साधु त्यांच्या मस्तकावर वरदहस्त ठेवीत आहे. त्यानंतर त्या साधूने मोहितेबाबांच्या कपाळावर आडवें भस्म फासून उभा टिळा लावला. हा क्षण मोहितेबाबांच्या आयुष्यातील एक उत्कट अनुभव होता. नंतर गुरुस्थानाला १०८ प्रदक्षिणा घालून ते द्वारकामाईंत बाबांच्या शिळेचे व प्रतिमेचे दर्शन घेण्यास गेले. दुपारच्या आरतीनंतर समाधिमंदिरात बाबांच्या समाधीजवळ ध्यानस्थ स्थितीत एकटे असतांना मोहितेबाबांना आणखी एक साक्षात्कार झाला. श्रीसाईबाबांच्या पुतळ्याच्याजागी त्यांना बाबांच्या बाल्यावस्था, तारूण्यावस्था व वृद्धावस्था दर्शविणाऱ्या तीन आकृति एका पाठोपाठ दिसल्या. शिरडीच्या प्रथम भेटीतच आलेल्या वरील अनुभवामुळे मोहितेबाबांच्या उपासनेला निश्चित दिशा व स्वरूप प्राप्त झाले व साईकृपेने ते आजतागायत टिकून आहे.

## साईबाबांच्या कृपाप्रसादाचे अनुभव :

(१) मोहितेबाबा परळ येथील रेल्वेच्या वर्कशॉपमध्यें नोकरी करीत असतांना घडलेली ही घटना आहे. एकदां कामावर असताना शिर्डीला जाण्याची मोहितेबाबांना अचानक प्रेरणा झाली. तडक कोणाचीही परवानगी न घेता ते दुपारी तीन वाजण्याच्या

सुमारास व्ही. टी. स्टेशनवर गेले व भुसावळ एक्सप्रेसमध्ये जाऊन बसले. मनमाडला गाडी बदलून ते कोपरगावला उतरले तेव्हा फार रात्र झाली होती. तेथे त्यांना एक टांगेवाला दिसला. आपण होऊनच त्या टांगेवाल्याने त्यांना विचारले, "तुम्हाला शिर्डीला जावयाचे आहे का? रात्रीची वेळ असल्याने मोहितेबाबांच्या मनात शंका चमकून गेली की हा टांगेवाला आपल्याला कोठेतरी नेऊन सोडील. तितक्यात त्या टांगेवाल्याने त्यांना हाताला धरून टांग्यात आपल्या बाजूला बसविले व त्यांना एक पेरू खावयास दिला. "तू पेरू खाईपर्यंत मी तुला शिर्डीला पोहोचवितो" असे म्हणून टांगेवाल्याने टांगा भरधाव सोडला व काही मिनिटातच टांगा शिर्डीला पोहोचला. "पैसे घ्यावयास मी नंतर येतो," असे सांगून टांगेवाला दिसेनासा झाला. त्यानंतर त्या टांगेवाल्याचा शिर्डीत व आसपास शोधाशोध करूनही ठावठिकाणा लागला नाही.

(२) १९५३ सालची गोष्ट. मोहितेबाबांनी डॉन मिल्सच्या जवळील केळीवाडी येथे पिंपळवृक्षाखाली मौनव्रत धारण करून २१ दिवसांचे अनुष्ठान आरंभिले होते. त्या काळात ते फक्त एकदाच रात्री अकराच्या सुमारास थोडीशी कॉफी घेत. आजूबाजूला भय्ये लोकांची बरीचशी वस्ती होती. मोहितेबाबांची व त्यांच्या व्रताची ते भय्ये लोक निरनिराळ्या तऱ्हेने कुचेष्टा करीत. त्यांना पहिले तीन-चार दिवस तर फार त्रास सहन करावा लागला. पुढे सातव्या दिवशी काही लोकांनी एक बारा वर्षे वयाचा मरणोन्मुख मुलगा त्यांच्या पुढ्यात आणून ठेवला. मौनव्रत स्वीकारलेले असल्याकारणाने मोहितेबाबांची थोडी पंचाईत झाली. तथापि श्रीसाईनाथांचा मनोमन धांवा करून त्यांनी शेजारी पेटत असलेल्या धुनीतील चिमुटभर उदी घेऊन त्या मृतवत् बालकाच्या अंगाला लावली व त्याच्या अंगावर तीर्थ शिंपडले. चारपाच मिनिटातच तो मुलगा सावध झाला व उठून बसला. हा चमत्कार प्रत्यक्ष बघून मोहितेबाबांची कुचेष्टा करणाऱ्या भय्ये मंडळीवर त्याचा परिणाम घडून आला व ते त्यांना मानाने वागवू लागले. साईबाबांच्या उदीचा हा प्रभाव पाहून मोहितेबाबांची साईबाबांवर फारच श्रद्धा बसली.

(३) ह्या भागातील हाउसिंग बोर्डाच्या वस्तीत राहणाऱ्या एका ख्रिश्चन मुलीला डॉक्टरांनी जवळजवळ सव्वाशे इंजेक्शन्स देऊनही काही गुण आला नव्हता पण मोहितेबाबांनी साईनाथांच्या उदीप्रसादाने तिला बरे केले. हा चमत्कार पाहून ते डॉक्टर्ससुद्धा आश्चर्य-चकित झाले.

(५) वांद्रे शहरी रहाणाऱ्या रखम्या कदम नावाच्या एका इसमाची अचानक १४ दिवस वाचा बंद झाली होती. केवळ साईनाथांच्या उदीनेच मोहितेबाबांनी सांगितलेल्या दिवशी त्याची वाचा परत आली.

(६) १९५७ साली शिर्डीहून परतताना मोहितेबाबांनी नेहमीप्रमाणे बरीचशी उदी बरोबर आणली होती. त्या उदीचा चमत्कार असा की तोंडात ठेवल्याबरोबर

त्याची चव साखरेसारखी लागत असे. ही उदी त्यांनी आसपासच्या वस्तींतील लोकांना वाटून टाकली व सर्वांना तसाच अनुभव आला.

(७) सुमारे वीस वर्षांपूर्वी एक महाराष्ट्रीयन गृहस्थ बंगालहून "काळी जादू" शिकून आला होता. तो वरळी भागातच कोठेतरी राहत असे. आपण आपल्या विद्येच्या जोरावर मोहितेबाबांनाच काय पण खुद्द श्री साईबाबांना सुद्धा गिळंकृत करू अशी त्याची वल्गना होती. त्याने अनेकप्रकारे मोहितेबाबांचा जवळजवळ आठवडाभर छळ केला. मोहितेबाबांनी मनोभावे साईनाथांची प्रार्थना करून त्यांना गाऱ्हाणें घातलें. त्यावरोबर साईच्या तसबिरीतील प्रतिमेला घाम फुटला त्यानंतर आपोआपच त्या जादूगाराचा उपद्रव होईनासा झाला.

श्रीसाईबाबांच्या कृपाप्रसादाच्या वरील सत्यकथा वाचल्यानंतर मस्तक खाली झुकते व मुखावाटे सहजोग्द्‌गार बाहेर पडतात, "नित्य मी जीवंत जाणा हेंचि सत्य।
नित्य घ्या प्रचीत अनुभवें॥

# श्रीसाईगीतमाला
# गीत ७ वे

श्रीसाईबाबा दुपारी १२ च्या सुमारास भिक्षा मागावयास जात असत. ज्यांच्या ज्यांच्या दाराशी ते जात, तेथे तेथे ते म्हणत असत

**"भिक्षा वाढा हो माई" अल्ला मालिक भले कराया दारिं तुझ्या येई ।।**

चौपदरी ही माझी झोळी
जन्म-मृत्युने मीच बांधिली
सुख-दुःखाची आशा नुरली
औट हात हा देह आमुचा उद्या पुन्हा नाही ।।१।।

टमरेलामधि भात भाकरी
पदार्थ पातळ कांही द्या तरी
सुके-कोरडे ओता झडकरी
सुखदुःखाची चवी कधी कां फकीर हा घेई ।।२।।

परमार्थाचा प्रपंच अमुचा
पदार्थ एकच परमात्म्याचा
रुचकर लागे एकच साचा
फकिरी एकच आहे अमीरी अन्य नसे कांही ।।३।।

नरजन्माचा भाव निरर्थक
बाल्य, तरुण नी जराचि दाहक
सरणी उरतो मृत्यू सेवक
नाती-गोती झूट सर्वही अल्लामालिक राही ।।४।।

आत्मतत्त्व हे उमज माणसा,
विसर सर्व तू भोग-लालसा,
गुरूचरणाची धरि अभिलाषा,
गुरुमंत्राने अभिमानाचे मेण वितळले जाई ।।५।।

**—मधुकर जोशी**

# सदा सर्वदा साईनाम घ्यावे

सदा सर्वदा साईनाम घ्यावे ।
श्री साईबाबा आपुले छत्र समजावे ॥
दुष्ट वासना मनी न आणावी ।
साई स्मृती सदैव हृदयी असावी ॥
जो करी साईनामाचा जप ।
त्यासी कधी न होईल मनस्ताप ॥
सर्वांनी श्री साईभक्त बनावे ।
सदैव त्यांच्या चरणी जावे ॥
"बाबांचा" जयजयकार करावा सर्वत्र ।
शिर्डी हे स्थान त्यांचे फार पवित्र ॥
श्री साईबाबांची गावी गोडवी ।
श्री साईबाबांची लिहावी थोरवी ॥
श्री साईची लीला फार अगाध ।
भक्त होतील त्यांच्या नामे धुंद ॥
श्री साईबाबा दाखवीती मोठे चमत्कार ।
त्यांना माझा साष्टांग नमस्कार ॥

—विजय रेगे

# गांठ रेशमाची

ही माझी वाट आगळी साई-भक्तीची
आस मनींची जिवंत आहे साई-चरणाची ॥धृ॥
अभक्तीचा करण्या बघतो मी विनाश
परी बांधुनी ओढतात हे संसारी पाश
सहाय्ये तुझ्या सुटेल कीं रे ! गांठ रेशमाची ॥१॥
या मार्गावर कितीक योगी, नि सिद्ध योगी
बनले, तुझ्या सहाय्ये, जे अतीव दुःखे भोगी
भवसागर हा तरुन जाण्या हवी जोड-पायांची ॥२॥
म्हणुनी आलो, इथे थांबलो, देई तुझा हात
ना तरि होइल देवा, सामोरी तुझिया हा घात
तुला न शोभे राजहंसा ग्रास-भक्षणासी ॥३॥
मी आहे खुळा पामर, घेई तू पदरांत
आहे तुझी कीर्ती पसरली तिन्ही त्रिखंडात
दाखवी पाय, नातरी, ना मिटे, भ्रांत-जीवाची ॥४॥

—श्री. भ. धों. कुंभकर्ण

## श्रीसाईनाथ वंदन

सद्‌गुरुनाथा, प्रभो साईनाथाऽऽ
तुझे रूप आम्ही किती किती पाहू!
तुझिया कृपेने तुझे गुण गाऊ! ध्रु.

भक्तजनां येते प्रचिती
दत्तगुरु तुजमधि दिसती
भक्तकोड पुरवी माये—तुझा ध्यास घेऊ! १

जगणे तर दुसऱ्यासाठी
मरणे तर दुसऱ्यासाठी
शिर टेकू चरणांवरती, धूलि भाळि लावू! २

चराचरा व्यापुनि उरसी
भक्तिभाव तू पारखशी
भक्तांचा देव भुकेला—गीत तुझे गाऊ! ३

दिक्कालातीत अनंता
भक्तवत्सला भगवंता
दिव्य दृष्टि देता तू रे दिव्य लोक पाहू! ४

—श्रीराम आठवले

## साईजी आले

सद्‌गुरु साईजी आले, शिर्डीचे भाग्य उजळले!

निंबाच्या झाडाखाली
गुरुमूर्ती सहजचि दिसली
चिंतनी वृत्ति रमलेली तन ब्रह्मानंदी डोले! १

पांढरी कफनी कटि लंगोटी
तेज रवीचे वदनावरती
डोई बांधुनि पाठीमागे वस्त्र शुभ्रसे सोडियले! २

निशिदिनि राही फकिर एकला
सोऽहं सिद्धी घडे सोहळा
संतांच्या समताभूमीवर सदय साईजी आले! ३

# एक प्रेरणा

नास्तिक हसतो, भक्त जनानां,
वदत मुखिं त्या, मूर्ख महा ।। ध्रु० ।।

अशी एक ही, जात न जगतो,
जिच्यात नाहीं, श्रद्धा भक्ती
मंदिर रूपें, भिन्न स्वरूपें–
स्थळें निर्मिली, विविध महा! ।।

देउळ अथवा, गुरुद्वार ही,
चर्च असो वा, मशिद असो ही,
एक प्रेरणा, उभारणितही–
आकांक्षाही एक पहा! ।।

परमेशाच्या अवतरणास्तव,
निवास स्थाना रचितो मानव,
नव्हे कल्पना प्रचीति अनुभव–.
साक्षात्कारी देव पहा! ।।

विसर पडावा क्षुद्र गोष्टिचा,
आठव यावा, उद्दिष्टांचा
जागृत करण्या नित आकांक्षा–
राउळ देउळ, प्रतीक महा! ।।

–लक्ष्मी तनया

# स्वप्न

काल ते स्वप्न गोड पडले
मंदिरी साईनाथ दिसले ।। ध्रु० ।।

राम-रहिम ते मीलन सुंदर
कबीर-तुलसी श्रीविश्वंभर
पीडितांचे ते सर्वेश्वर
पुनरपि कां अवतरले? ।।। १

तेजोवलयी प्रसन्न मूर्ति
श्रीरामाचे धनुष्य हाती
श्रीकृष्णाची मुरली ओठीं
छत्रचामराखाली बसले! २

विश्वव्यथेचे डोळे पुसुनी
माणुसकीचे मळे फुलवुनी
भक्तीचे ते तळे भरूनी
सद्भावांचे रंग उडविले! ३

त्या रंगांच्या ओलाव्यानें
हबकुन उठलो-नवी लोचनें!
बाबांची ती ऐकत वचनें
"देव जागवा माणसांतले" ! ४

–विनायक पाठक

# पोटाची वेलांटी

देवा तुवा दिले । मज दोन हात
परी शृंखलेत । वरिष्ठांच्या ॥१॥

दिले मज पाय । कृपा झाली तूझी
भूमि दुसऱ्यांची । कुठे ठेवूं? ॥२॥

जरी म्यां लाभले । मांसाचे हे डोळे
अंधारात खूळे । संपत्तीच्या ॥३॥

पोटाची वेलांटी । दिली बा उलटी
चिकटते पाठी । जन्मभर ॥४॥

दान हेचि देगा । देवा मज थोर
सत्ता मृत्यूवर । राहो माझी ॥५॥

# आळसाचे पाय

आळसाचे पाय । तुडविती पोट
हाती आली वाट । चूकलेली ॥ १ ॥

आळसाच्या तंद्री । नासवले क्षण
हातामधे ऋण । राहिलेच ॥ २ ॥

स्वप्नीं सुद्धा नसे । नक्षत्रांची रास
त्यांचा होतो त्रास । झोपाळूस ॥ ३ ॥

परस्पर लोकी । माझे काम सारे
कानातले वारे । कानातच ॥ ४ ॥

जीभरूपी गोळा । भक्षिला ओठांनी
हालेना तेथोनी । आळसानें ॥ ५ ॥

सत्य आणि भ्रांत । कसली ना खंत
झोपला देहांत । कुंभकर्ण ॥ ६ ॥

—डॉ. श्रीराम पंडित.

# साहित्य दर्शन

(अनेक लेखक प्रकाशक व साई भक्त यांच्या आग्रहावरून पुस्तक अभिप्रायाचे हे नवे सदर सुरू करीत आहोत. लेखक–प्रकाशकांनी आपल्या पुस्तकाची प्रत भेटीदाखल पाठविल्यास त्यावर या सदरातून अभिप्राय देऊच) संपादक

**"श्री दासगणू महाराजांचे संक्षिप्त चरित्र"**

(संतकवि श्रीदासगणू महाराज दर्शन– संपादक– मधुकर दत्तात्रेय जोशी प्रकाशक- आनंदीदास दे. लव्हेकर अॅड. आनंदीभुवन, नांदेड, पृष्ठसंख्या १६३, मूल्य रु. पाच)

श्रीसंतकवि श्रीमत् दासगणू महाराज हे श्रीसाईबाबांचे समकालीन एक थोर महाराज होऊन गेले. संतकवि श्रीदासगणू महाराजांच्या शतसांवत्सरिक महोत्सवाच्या निमित्ताने हा ग्रंथ महाराजांचे स्मरण महाराष्ट्रीयांना व्हावे या उद्देशाने प्रकाशित केला आहे. ज्यांनी आपले जीवन ज्ञानासाठी भक्तीसाठी वेचले, त्यांच्या काव्यगंगेत पुनीत होता यावे या हेतुपुरस्सर भावनेने लेखकाने अगदीच मोजक्याच पृष्ठसंख्येत महाराजांचे जीवनदर्शन घडविण्याचा यथार्थ प्रयत्न केला आहे. श्रीदासगणू महाराजांचा काव्यसंभार प्रचंड आहे, आणि त्यातूनही अत्यल्प असा भाग सादर करून महाराजांच्या काव्याची माहिती व महती रसिकांसमोर आणावी व त्याचप्रमाणे श्रीमहाराजांचे काव्य नव्या पिढीस दृग्गोचर व्हावे, जनमानसात ठसले जावे हाही एक लेखकाचा उद्देश असावा.

जसे महाराजांचे काव्य श्रेष्ठ तसेच त्यांचे जीवनही. महाराजांच्या प्रचंड काव्य-संपदेचा प्रसार, प्रसिद्धी व त्यांचे जीवन चरित्र ह्यांचे उत्तम दर्शन ह्या चरित्र ग्रंथात होते. श्रीसमर्थांचे निष्ठावान उपासक, श्रीपांडुरंगाचे अनन्य भक्त व सकल संतांचे चरणरज श्रीमत सग्दुरू दासगणूंचे अल्पावधी जीवन जवळून पाहिले ते श्री. मधुकर द. जोशी यांनी त्यांच्या लेखनशैलीतील लिहिलेला हा ग्रंथ अगदी काव्यरसप्रधान व बोधप्रद असाच आहे.

ह्या ग्रंथात महाराजांच्या विशाल वाङमयांतील निवडक काव्य एकत्रित केले आहे. प्रेमरसाने ओथंबलेली भक्तिपूर्ण भजने, जिव्हाळ्याच्या बोध करणाऱ्या उपदेशपर कविता आणि अनेक विषयावर त्यांनी आपले मौलिक विचार ठायी ठायी प्रगट केले आहेत, ते सारांशाने येथे विस्तृतपणे देण्याचा चरित्रकाराने सुरम्य प्रयत्न केला आहे याबरोबरच त्यांची उपदेशपर पद्ये, विविध विचार, सुभाषिते श्लोक इ. तसेच सग्दुरूंच्या अर्वाचीन हस्ताक्षराची एक प्रत, आर्दीची काव्यजोड सोबत आहे. हे विशेष होय.

एका भाविकाने घेतलेले व घडविलेले हे दर्शन श्रीसग्दुरूंच्या भक्तांना आवडेल ह्यात शंका नाही.

—साईनंद

# —शिरडी वृत्त माहे मे १९७४—

शिर्डीस प्रत्येक वर्षी मे महिन्यात दिसणारे गर्दीचे दृश्य यावेळी संपूर्ण मे महिना बघावयास मिळाले नाही कारण नेमका मे महिन्यातच रेल्वे संप झाला व त्याचा परिणाम साई दर्शनास येणाऱ्या भक्तांच्या गर्दीवर दिसून आला. तरीपण महाराष्ट्रातील असंख्य ठिकाणांहून नित्य नियमाने मे महिन्यात येणाऱ्या भक्तांनी अनेक अडीअडचणी सोसून आपली वारी पूर्ण केली. २७ मे रोजी संप संपल्यानंतर लगेच गर्दीच्या प्रमाणात वाढ दिसून आली. गुरुवार दि. ३०–५–७४ रोजी तर गर्दीने संस्थान व मंदिर परिसर खच्चून भरून गेला होता.

काही भक्त कलाकारांनीं श्रींच्या पुढे आपापल्या कलेची श्रद्धेने हजेरी दिली त्यांची नांवे पुढील प्रमाणे:—

१) श्री. ग. वि. जोशी, शास्त्री, संस्थान गवई यांची कीर्तने,
२) ह. भ. प. लक्ष्मणबुवा वाघचौरे, शिर्डी यांचे भजनी निरूपण.
३) ह. भ. प. अनिल मराठे ऊर्फ सेवकदास जळगाव.
४) ह. भ. प. जगन्नाथ वि. वाघचौरे, शिर्डी.
५) ह. भ. प. रामचंद्र श. महामुनी, अंमळनेर.
६) सौ. शोभना रा. महामुनी, जळगाव.

**गायन, भजन, वादन.**

१) श्री. दामुअण्णा म. दळवी, श्रीरामपूर
२) श्री. आत्मानंद बा. आचरेकर, मुंबई.
३) श्री. मधुसूदन राघोबा चव्हाण, मुंबई
४) श्री. गोपाळ विष्णू गावडे, मुंबई
५) श्री. बाबूराव वि. बांदिवडेकर.
६) प्रभात ब्रास बँड, पुणे,.
७) सत्यसाई सेवा समिती, त्रिवेंद्रम
८) श्री. मोहन ल. काणेकर. मुंबई
९) सत्यसाई सेवा समिती, अंधेरी, मुंबई.

मे १९७४ या महिन्यात खालील अधिकारी व्यक्तींनी संस्थानला भेट देऊन संस्थेवरील आपले प्रेम व्यक्त केले:—

१) मा. श्री. व्ही. सुंदरम्, आय. ए. एस. जिल्हाधिकारी, अहमदनगर.
२) मा. श्री. गुप्ता, जनरल मॅनेजर, पंजाब नॅशनल बँक, दिल्ली.
३) मा. श्री. श्रीनिवास दा. पाटील, प्रांत ऑफिसर, संगमनेर.
४) मा. नामदार श्री. कल्याणराव पी. पाटील, उद्योग, बीज,

वन व पर्यटन राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य.

५) मा. श्री. विलासराव पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी, अहमदनगर.

**हवापाणी:-**

शिर्डी येथे दर वर्षापेक्षा या वर्षी उन्हाळा जास्त प्रमाणात भासला .तरीपण रात्रीचे वेळी हवेतील गारव्यामुळे या उष्म्याचा दाह तितका जाणवला नाही. श्रीसाईकृपा प्रसादाने कोणतीही रोगराई वगैरे नाही. मे महिन्याचे शेवटचे आठवडयात कृतिका नक्षत्राचा पाऊस पडला. त्यामुळे सर्व संस्थान परिसरातील घाण वाहून जाऊन परिसर जास्त स्वच्छ झाला आहे.

**इतर वृत्त विशेषः-**

रामनवमीच्या उत्सवा प्रीत्यर्थ प्रकाशित केलेल्या दैनंदिनीचे १९७४ वाटप सुरू केले असून त्यांस भक्तांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे.

संस्थान रुग्णालयातील रुग्णांना पाव, चीज यांचे वाटप केले आहे.


# श्री साईलीला

## येत्या ऑगस्टच्या अंकाची झलक

* पुणे जिल्ह्याची पंढरी-"कडूस" सुरम्य क्षेत्रस्थानाचा रसिला परिचय
* छत्रपतींचे कुलदैवत-शिखर शिंगणापुरचा शंभूमहादेव
  छत्रपतींच्या त्रिशतसांवत्सारिक राज्यारोहण समारोहानिमित्त खास लेख
* भेटीगाठी ह्या सदरात, शिर्डी साईमंदिरातील मुख्य पुजारी
  श्री. दिगंबरराव जाखडी ह्यांची मनोरंजक मुलाखत
* संत सेना महाराज- पुण्यतिथीनिमित्त खास लेख
* गोकुळाष्टमी निमित्त भगवान श्रीकृष्णावरील रंजक लेख

याशिवाय-साईभक्तांची श्रद्धास्थाने, श्रीसाईनाथ ललितचरित्र, गोंदवलेकर महाराज चरित्र, साहित्यदर्शन, आणि श्री साईभक्तांच्या पुन्हा पुन्हा गुणगुणाव्यात अशा भावरस प्रधान कविता इ. इ.

पृष्ठे ४८ किंमत अवघी साठ पैसे.



# तीन रंगी आशीर्वाद फोटो

| आकार | किमत | आकार | किमत |
|---|---|---|---|
| १४" × २०" | रु. १-५० | ८" × १०" | रु. ०-५० |
| १०" × १४" | रु. १-०० | २½" × ३½" | रु. ०-२० |
| ४½" × ५½" | रु. ०-३० | | |

प्रसिद्ध ब्लॉकमेकर श्री. **डी. डी. नेरॉय** यांच्या ब्लॉक्सवरून छापलेले फोटो

| प्रकार | रंग | आकार (सें. मी) | किमत |
|---|---|---|---|
| १. शिलेवर बसलेले बाबा | तीन रंगी | ३५.५६ × ५०.८ | १-५० |
| २. शिलेवर बसलेले बाबा | काळा व पांढरा | " " | १-२० |
| ३. शिलेवर बसलेले बाबा | " | २२.८६ × ३३-०२ | ०-५० |
| ४. द्वारकामाईतील बाबा | तीन रंगी | " " | ०-५० |
| ५. शिरडी दर्शन ( ६६ फोटोंचा अल्बम ) | | | २-०० |

**श्री साईबाबा संस्थानच्या कार्यालयांचे पत्ते :**

१. शिरडी, ता. कोपरगांव, जि. अहमदनगर (महाराष्ट्र).

२. साईनिकेतन, डॉ. आंबेडकर रोड, प्लॉट नं. ८०४ बी., दादर, मुं. नं. १४

Regd. No. MH/BYE/26

Sai Baba Tutorial Academy's

# Inter Arts Classes

(1943)

Kshatriya Niwas, Portuguese Church, Girgaon,
Opp. Lakhani Book Depot, Bombay 4. Tel. 354337

*

**The only special Inter Arts Classes in Bombay**

*

100 % Results last 21 consecutive years.

*

Logic, Economics, English, French.

*

Psychology, Sociology, western Civilization.

*

Taught with exhaustive cyclostyled notes.

*

Probable questions with class-getting answers issued every year for the University Examination with 100 % accuracy.

*

Patronised by children of Ministers, Supreme Court, High Court, Small Cause Court Judges, Presidency Magistrates and eminent industrialists.

BATCHES :— OCTOBER/APRIL
TIMINGS:–Morning, afternoon, evening.
STARTING FROM 4TH July 1974.
HURRY UP ! LIMITED ADMISSIONS !

मुद्रक : श्रीमती लक्ष्मीबाई नारायण चौधरी, निर्णयसागर प्रेस,
४५-डीई, ऑफ टोकरसी जीवराज रोड, शिवडी, मुंबई–१५.
संपादक व प्रकाशक : श्री. का. सी. पाठक, 'साई निकेतन', डॉ. आंबेडकर रोड
खोदादाद सर्कलजवळ, प्लॉट नं. ८०४ बी, दादर, मुंबई, १४.